cmyk

## संपादकीय

### आणखी एक विषाणू...!

सर्वसाधारणपणे दर शंभर वर्षाला महामारी येते असे म्हटले जाते. पाच वर्षांपूर्वी कोरोना महामारी आली परंतु आता २०२५ मध्ये आणखी एक महामारी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एचएमपीव्हीच्या रूपाने ही महामारी येते की काय अशी भीती काही जण व्यक्त करत आहेत. त्यादृष्टीने जागतिक स्तरावरील आरोग्य यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. कोरोना महामारीने जगभरातील आरोग्य यंत्रणा हादरवून टाकल्या होत्या. भारतासह संपूर्ण जगात हाहाकार उडाला होता. कोरोनामुळे लाखो लोकांचा मृत्यू झाला आणि जगाला लॉकडाऊनला सामोरे जावे लागले. लोकांनी घरात राहून अनेक महिने काढले.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२५६ | बुधवार, दि.८ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांच्या कृषी पंपासाठी सोलार पार्क

## राज्यातील ४ जिल्ह्यात उभारणी , शेतकऱ्यांना होणार दिवसा वीज उपलब्ध

**पुणे । प्रतिनिधी**

**एसजेव्हीएन ग्रीन एनर्जीमार्फत राज्यातील चार जिल्ह्यांमध्ये तब्बल १ हजार ३५२ मेगावॉटचे सोलर पार्क उभारले जाणार आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतंर्गत २ ते १० मेगावॉट क्षमतेचे १०२ सौरऊर्जा प्रकल्प उभारले जाणार आहेत. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर या ४ जिल्ह्यांमध्ये हे प्रकल्प असणार आहेत. ग्रीडने जोडलेल्या या प्रकल्पांमध्ये तयार होणारी वीज शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला पुरवली जाणार आहे.**

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी, म्हणून ग्रामीण भागात सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कमी क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प उभारले जाणार आहेत. तेथे तयार होणारी वीज महावितरणच्या वीज उपकेंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुरविली जाणार आहे. त्यानुसार एसजेव्हीएन ग्रीन एनर्जीकडून राज्यात पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूर या चार जिल्ह्यांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प उभारणे, त्याची देखभाल दुरुस्ती आणि



संचलनासाठी निविदा काढल्या आहेत. या प्रकल्पातून पुढील २५ वर्षे वीजपुरवठा होऊ शकणार आहे. सौर कृषी वाहिनी योजनेतंर्गत उभारल्या जाणाऱ्या सौर प्रकल्पांमुळे सध्या वीज केंद्रांवर येत असलेला भार कमी होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाल्याने पिकांसाठी हवे तेव्हा सिंचन करता येणार आहे.

इरिगेशन फेडरेशनचे अध्यक्ष विक्रांत पाटील किणीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात काम सुरू आहे. परंतु, ज्या खासगी कंपन्यांना टेंडरद्वारे वीज निर्मीती करण्यासाठी परवानगी दिली जात आहे. यामध्ये पारदर्शी कारभार आला पाहिजे, नाहीतर खासगी कंपन्यांकडून वीजनिर्मीतीच्या माध्यमातून लुबाडणूक होण्याची शक्यता आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना सोलर पंप घेण्याची सक्ती केली जात आहे. ◀◀ पान २ वर

### याठिकाणी उभारले जाणार प्रकल्प

पुणे येथील ९ ठिकाणी एकूण १५४ मेगावॅट, नाशिक येथील २२ ठिकाणी ३०४ मेगावॅट, छत्रपती संभाजीनगर १९ ठिकाणी ३१५ मेगावॅट तर सोलापूर येथील ५२ ठिकाणी ५७९ मेगावॅट वीज निर्मीती प्रकल्प होणार आहेत.

# आरोपींना मोक्का लावा, बिनभाड्याच्या खोलीतच ठेवा -आ. सुरेश धस



### यांचा तेरे नाम मधील सलमान खान झाला पाहिजे

सुरेश धस म्हणाले की, ''या प्रकरणात उज्ज्वल निकम यांना केस कशी मिळेल यासाठी मी प्रयत्न करतोय. यांना बिनभाड्याच्या खोलीत ठेवले पाहिजे. जवळचे नातेवाईक, मित्रमंडळ कुणालाही त्यांना भेटता आले नाही पाहिजे. यांना एकटे पाडू द्या. यांची तेरे नाम चित्रपटातील सलमान खानसारखी अवस्था झाली पाहिजे. हे खुळेच झाले पाहिजेत, असे धस म्हणाले.

**मुंबई । प्रतिनिधी**

**संतोष देशमुखचा गुन्हा काय होता? गावातील एक दलित वॉचमनला मारहाण होताना तो रोखायला गेला, खंडणी मागणाऱ्यांना विरोध केला म्हणून त्याची निर्घृण हत्या केल्याचा आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला. संतोष देशमुखच्या मारेकऱ्यांना मोक्का लावा, त्यांना बिनभाड्याच्या खोलीत ठेवा अशी मागणी त्यांनी केली. या आरोपींना त्यांच्या नातेवाईकांना आणि मित्रमंडळींना भेटू देऊ नका, त्यांची तेरे नाम चित्रपटातील** ◀◀ पान २ वर

# बीडचे अधिकारी त्या वेळच्या पालकमंत्र्यांनी आणले!

## संतोष देशमुख माझा कार्यकर्ता, दोषींना शिक्षा झाली पाहिजे; मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली रोखठोक भुमिका



**बीड । पतिनिधी**

**बीडचे अधिकारी बहुतांश एकाच जातीचे आणि एकाच नेत्याच्या जवळचे असल्याचा आरोप या आधी करण्यात आला होता. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही नावासहित त्याची आकडेवारी समोर आणली होती. त्यावर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, ''मी पाच वर्षे जिल्ह्याच्या राजकारणापासून दूर होते. मग हे अधिकारी मी आणले का? बीडमधील हे अधिकारी पालकमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी आणले आहेत. धनंजय मुंडे हे पालकमंत्री होते, पण आरोपींना शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी त्यांनीही केली, आहे असे पंकजा मुंडे म्हणाल्या. संतोष देशमुख माझा कार्यकर्ता होता. त्यामुळे त्याच्या कुटुंबीयांना घेऊन भाषण देण्यापेक्षा त्यांना न्याय मिळणे महत्त्वाचे आहे, तीच माझी भूमिका आहे असे राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.**

पर्यावरण खात्याचा पदभार घेतल्यानंतर पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना बोलत होत्या. पंकजा मुंडे म्हणाल्या, आपण गेल्या पाच वर्षांपासून बीडच्या राजकारणापासून दूर होतो. त्यामुळे सध्या जिल्ह्यात कार्यरत असलेले अधिकारी त्यावेळचे पालकमंत्री आणि मुख्यमंत्र्यांनी आणले आहेत. तसेच अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बीडचे राजकीय पर्यावरण सुधारू ◀◀ पान २ वर

### माझे कार्यकर्ते असतील तरी कारवाई करा

पंकजा मुंडे म्हणाल्या की, ''अंजली दमानियांना जे कोणी धमकावत असतील तर त्यांनी तक्रार दाखल केली पाहिजे. ते माझे कार्यकर्ते नाहीत. त्यामुळे त्यांनी माझे नाव घेताना, कोणत्याही जातीविषयी बोलताना काळजी घ्यावी. कारण मी पाच वर्षे बाहेर होते. माझे कार्यकर्ते जरी असतील तरीही त्यांच्यावर कारवाई करावी, असे त्या म्हणाल्या.

## दिल्ली विधानसभेसाठी ५ फेब्रुवारीला मतदान

नवी दिल्ली : देशाची राजधानी असलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या तारखा निवडणूक आयोगाने जाहीर केल्या आहेत. दिल्लीत एकाच टप्प्यात निवडणूकीसाठी ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. तर ८ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. ७० विधानसभा जागांसाठी १० जानेवारी २०२५ पासून अधिसूचना जारी केली जाणार आहे. नामांकनाची तारीख १७ जानेवारी असून २० जानेवारीपर्यंत उमेदवारांना त्यांची नावे मागे घेण्याची मुदत असणार आहे. निवडणूक आयोगाचे प्रमुख राजीव कुमार म्हणाले की, ''दिल्लीत १ कोटी ५५ लाख अधिक मतदारांनी आपली नावे नोंदवली आहेत. यामध्ये १८ ते १९ वर्षे वयोगटातील २ लाख ८ हजार नवीन मतदार आहेत. दिल्लीत १०० वर्षांवरील मतदारांची संख्या ◀◀ पान २ वर

# जिल्ह्याच्या विकासाला 'दिशा' देण्याची खा.सोनवणेंची तळमळ

## विकास कामांचा घेतला आढावा, अनेक खातेप्रमुखांना मुद्देसूदपणे धरले धारेवर, जलजीवनच्या कामांना गती देण्याचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात विकास कामांना गती देण्यासाठी खा.बजरंग सोनवणे सरसावले असून मंगळवार दि.७ जानेवारी रोजी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा विकास समन्वय व संनियत्रण समितीची बैठक घेण्यात आली. खा.बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीला जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने आणि सर्व विभागांच्या खातेप्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी खा.सोनवणे यांनी आपण सर्व मिळून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करू, असे म्हणत अधिकाऱ्यांना विश्वासात घेतलेच




शिवाय, अनेक मुद्दयावर त्यांनी अधिकाऱ्यांची कानउघडणी देखील केली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दिशा समिती अंतर्गत विषयाचा/योजनांचा सन २०२४-२५ या वर्षाचा डिसेंबर अखेरचा आढावा खा.बजरंग सोनवणे यांनी घेतली. ११ वाजता या बैठकीला सुरूवात ◀◀ पान २ वर

# खोटे कागदपत्र दाखल करून भुखंड हडपण्याचा प्रयत्न

## गुन्हा दाखल करण्याचे न्यायलयाचे आदेश

**गेवराई । प्रतिनिधी**

**भाड्याने दिलेली जागा बळकावण्यासाठी गेवराई येथील अब्दुल हन्नान मोहंमद युसूफोद्दीन यांनी खोटा अर्ज गेवराई बाजार समितीकडे दाखल करून सदरील जागा हडपण्याचा प्रयत्न केला. मात्र हा बनाव मयताच्या मुलाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत न्यायालयात अर्ज दाखल केला होता. न्यायालयात साक्ष पुरावे समोर आल्यानंतर न्यायालयाने आरोपी विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.**

गेवराई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीने शेख खुदस शेख इस्माईल (रा मादळमोही) यांना एक भुखंड भाड्याने दिला होता. त्यांनी त्या जागेवर बरेच वर्षे व्यवसाय चालविला परंतु त्यांचे नातेवाईक असलेले अब्दुल हन्नान मोहंमद युसूफोद्दीन यांनी शेख खुद्दूस यांच्यानावाने स्वतः अर्ज लिहून व शेख खुदूस यांची स्वतः सही करून सदर भुखंड परत करण्याचा खोटा व बनावट अर्ज कृषी उत्पन्न बाजार समितीत दिला व त्याच दिवशी स्वतःला भुखंड मिळण्याच्या मागणीचा अर्ज सुध्दा दिला. त्यानंतर शेख खुदूस हे आजारी पडल्यानंतर मयत झाले. वडीलांच्या जागेचे काय झाले याचा शोध त्यांचा मुलगा शेख सिद्दीकी शेख खुदुस याने घेण्याचा ◀◀ पान २ वर

# मायक्रोसॉफ्टची भारतात ३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक ; सत्या नादेला यांची घोषणा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**



**बील गेट्स यांची जगप्रसिद्ध सॉफ्टवेअर कंपनी मायक्रोसॉफ्टने भारतात मोठी गुंतवणूक करणार असल्याची घोषणा केली आहे. या संदर्भातील माहिती मायक्रोसॉफ्ट कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नादेला यांनी त्यांच्या एक्स सोशल मीडिया अकाऊंटवरून दिली आहे.**

मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नादेला यांनी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये तंत्रज्ञान नवोपक्रम आणि एआयवर चर्चा झाली. दरम्यान भारताला एआय प्रथम राष्ट्र म्हणून स्थान देण्यासाठी पाठिंबा देण्याचे आश्वासन नादेला यांनी पीएम मोदींना दिले. यानंतर त्यांनी ही महत्त्वाची घोषणा केली आहे. वृत्तानुसार, मायक्रोसॉफ्टचे सीईओ नादेला यांनी भारतात ३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार असल्याची घोषणा केली आहे. ◀◀ पान २ वर

# महाराष्ट्रात राबविले जाणार 'ई – कॅबीनेट'

## गतीमान आणि पारदर्शी कारभारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या कारभारात जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता आणि गतीमानता आणण्यावर भर दिला असून त्याचाच एक भाग म्हणून ई-कॅबीनेटचा निर्णय घेतला आहे. एनआयसीने विकसित केलेल्या**



**ई-कॅबिनेट ह्या प्रणालीचे सादरीकरण मंगळवारी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी मंत्रिमंडळ बैठकीत केले.**

मंत्रिमंडळ बैठकीसाठी कागदांचा मोठ्या प्रमाणावर होणारा वापर कमी करण्यासाठी हे संपूर्ण आयसीटी सोल्यूशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रणालीमुळे ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.७ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १९.५० क्विंटल | २,६५० | ३,५८० | २,९६६ |
| ज्वारी/हायब्रिड: ८६.०० क्विंटल | २,०५० | २,५२० | २,२५० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ९९.०० क्विंटल | ५,८०१ | ७,५११ | ७,२६० |
| उडीद : ४.५० क्विंटल | ५,४१० | ६,७०० | ६,०५५ |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,७०१ | ३,३५१ | ३,०२६ |
| मुग : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| सोयाबीन: १५१.०० क्विंटल | ४,०७१ | ४,१०५ | ४,०९६ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,३०० | ५,४०० | ४,८५० |


## आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्या पाठपुराव्याला यश

# बीडच्या बायपासवर दोन्ही ठिकाणच्या उड्डाणपूल आणि सर्व्हिस रोडची निवीदा प्रसिद्ध

**बीड । प्रतिनिधी**

**आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या निरंतर प्रयत्न आणि पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. मा.उच्च न्यायालयाच्यख निर्देशानुसार बीड शहराच्या बाजूने जाणार्या बायपासवर दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि इतर ठिकाणच्या स्लीप सर्व्हिस रोडच्या कामासाठी आता निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. २२ जानेवारीपर्यंत निवीदा मागविल्या असून लवकरच काम सुरू केले जाणार आहे.**





बीड बायपासवर बीड शहरात ये-जा करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज चौक समनापूर व महालक्ष्मी चौक, जिरेवाडी ही दोन ठिकाणे प्रवेशद्वार होती. परंतु याठिकाणी उड्डाणपूल नसल्यामुळे याठिकाणांवर अपघातांची मालिका सुरू होती. यासोबतच इमामपूर, नाथापूर व परळी रोडला स्लीप सर्व्हिस रोड नसल्यामुळेही या भागातील नागरिक आणि या परिसरात शेती असलेले शेतकरी यांना त्यांच्या शेतात जदिवसेंदिवस होत असलेले अपघात आणि जाणारे जीव यांची दखल आता मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने घेतली असून यासंदर्भातील आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने निर्णय दिला असून, डिसेंबर २०२४ पर्यंत १२ कि.मी. अंतर असलेल्या बीड शहराच्या लगत असलेल्या बायपासवर छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक येथे उड्डाणपूल तसेच इमामपूर रोड, नाथापूर रोड, परळी रोड या ठिकाणांवर स्लीप सर्विस रोड मंजूर करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले होते. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या कामांची निविदा २ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून २२ जानेवारीपर्यंत २०२५ निविदा मागविल्या आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून औरंगाबाद-येडशी महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचे काम २०१५ साली सुरू करण्यात आले होते. याच कामांतर्गत महामार्गावर बीड शहराच्या पूर्व बाजूने १२ कि.मी. अंतराचा बायपास म्हणजेच बाह्यवळण रस्ता तयार करण्यात आला. परंतु हा बायपास तयार करताना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# आणखी एक विषाणू...!


सर्वसाधारणपणे दर शंभर वर्षाला महामारी येते असे म्हटले जाते. पाच वर्षापूर्वी कोरोना महामारी आली परंतु आता २०२५ मध्ये आणखी एक महामारी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एचएमपीव्हीच्या रूपाने ही महामारी येते की काय अशी भीती काही जण व्यक्त करत आहेत. त्यादृष्टीने जागतिक स्तरावरील आरोग्य यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. कोरोना महामारीने जगभरातील आरोग्य यंत्रणा हादरवून टाकल्या होत्या. भारतासह संपूर्ण जगात हाहाकार उडाला होता. कोरोनामुळे लाखो लोकांचा मृत्यू झाला आणि जगाला लॉकडाऊनला सामोरे जावे लागले. लोकांनी घरात राहून अनेक महिने काढले. एकीकडे साथरोगाने लोकांचा जीव घेतला तर दुसरीकडे लॉकडाऊनमुळे लोकांचे व्यवसाय बुडाले, रोजगार ठप्प झाला. निराश होऊन अनेक लोकांनी आत्महत्याही केल्या. लॉकडाऊनच्या प्रभावातून आजही लोक सावरू शकलेले नाहीत. उलट आजही काही आयटी संस्था आपल्या कर्मचाऱ्यांसाठी लॉकडाऊनचा वापर करताना दिसतात.

काहीच वर्षांपूर्वी जगाला कोरोना नामक विषाणूने हादरवले होते. चीनच्या वुहानमधून पसरलेल्या विषाणूने जगभरात हाहाकार उडवला होता. या विषाणूने लक्षावधी बळी घेतले. हा विषाणू कसा उद्भवला याचा तपास अजूनही सुरू आहे. त्यात आता एचएमपीव्ही या आणखी एका नव्या विषाणूची भर पडली आहे आणि तो चीनमधूनच पसरतो आहे. म्हणजे महाभयानक विषाणूंची चीन ही जननीच बनली आहे. कोरोनाने जगभरात जशी परिस्थिती निर्माण केली होती तशीच स्थिती नव्या विषाणूने चीनमध्ये निर्माण केली असल्याचे सांगितले जात आहे. तेथे हा विषाणू वेगाने पसरत आहे. नव्या विषाणूची बाधा झालेल्या रुग्णांमुळे रुग्णालये तुडुंब भरली आहेत आणि यात बळी पडलेल्यांना स्मशानभूमीत जागा मिळत नसल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, यासंबंधीचे ठोस पुरावे अजून मिळालेले नाहीत शिवाय चीनने या वृत्ताचा इन्कार केला आहे. एचएमपीव्ही विषाणूची लक्षणे सर्वसामान्यपणे कोरोनासारखीच आहेत. म्हणजे खोकला, ताप व सर्दी यासारखी लक्षणे आहेत. नवा विषाणू खोकताना आणि शिंकताना बाहेर पडलेल्या थेंबाद्वारे पसरतो म्हणे. संक्रमित व्यक्तीच्या संपर्कामुळे अथवा दूषित वातावरणामुळेही या विषाणूचे संक्रमण होऊ शकते. म्हणजे हा विकार श्वसनासंबंधित आहे. संसर्गाचा कालावधी तीन ते पाच दिवसांचा असतो. हा विषाणू हिवाळा आणि वसंत ऋतूमध्ये जास्त प्रमाणात आढळतो. लहान मुले, वृद्ध तसेच एखाद्या आजाराने त्रस्त असलेले आणि कमकुवत रोगप्रतिकारशक्ती असलेले लोक नव्या विषाणूला बळी पडू शकतात. १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये नव्या विषाणूची मोठ्या प्रमाणावर लागण झाली आहे. नव्या विषाणूवर सध्या तरी कोणतीही लस विकसित झालेली नाही. नवा विषाणू श्वसनसंस्थेद्वारा पसरतो असे सांगण्यात येत आहे. हा विषाणू श्वसनप्रणालीद्वारा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरतो. संबंधित वस्तूला स्पर्श केला तर संसर्ग होऊ शकतो. शांघायमधील एका श्वसनतज्ज्ञाने इशारा देताना म्हटले आहे की, नव्या विषाणूवर वैद्यकीय सल्ल्याशिवाय उपचार करण्यासाठी अँटीव्हायरल औषधे वापरू नयेत. जरी त्याची लक्षणे सामान्य सर्दीसारखी असली तरी लक्षणे गंभीर झाल्यास त्या व्यक्तीला रुग्णालयात दाखल करण्याची वेळ येऊ शकते. नव्या विषाणूने चीनमध्ये उच्छाद मांडलेला असला तरी हा विषाणू भारतासाठी किती धोकादायक आहे आणि भारतात त्याचा प्रसार होऊ नये. यासाठी काय केले जाऊ शकते यासंबंधी विचार करायला हवा. या संदर्भात केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे की, देशात व्हायरल इन्फेक्शन आणि श्वसन रोगांच्या संख्येत म्हणावी तशी मोठी वाढ झालेली नाही. राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र देशभरातील अशा प्रकरणांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. जागतिक स्तरावर या आजाराच्या स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांशी देखील संपर्क साधला जात आहे. आरोग्य सेवा महासंचालक डॉ. अतुल गोयल यांनी म्हटले आहे की, चीनमध्ये आढळलेला नवा विषाणू श्वसनाच्या विषाणूसारखा आहे. त्यामुळे वृद्ध आणि लहान मुलांमध्ये फ्ल्यूसारखी लक्षणे दिसू शकतात. म्हणून लोकांनी श्वासोच्छवासाच्या आजाराबाबत सावधगिरी बाळगायला हवी. नव्या आजारामुळे देशातील नागरिकांनी घाबरण्याची गरज नाही. कारण अशा प्रकारच्या संकटाचा सामना करण्यासाठी देशातील सर्व प्रकारची आरोग्य यंत्रणा सज्ज आणि सक्षम आहे. जो डर गया वो मर गया हे आपल्याला कोरोना महामारीने शिकवले आहे. चीनमध्ये नवा विषाणू झपाट्याने पसरत असला तरी भारतीयांनी घाबरण्याचे कारण नाही. कारण हा आजार लहान मुलांसाठी खूप सामान्य आहे. सुमारे १०० टक्के लहान मुलांना चार ते पाच वर्षांपर्यंत हा आजार होतोच. काहींना फुफ्फुसाचा संसर्ग होतो तर काही व्यक्तींना दम्याचा त्रास होण्याची शक्यता असते. नवा विषाणू धोकादायक किंवा प्राणघातक नाही. त्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही मात्र सतर्क रहावे लागणार आहे.

# ऑनलाईन मार्केटिंगच्या युगात महिला बचत गटांनी दर्जेदार वस्तूंचे उत्पादन करावे-अर्पिता ठुबे

## अंबाजोगाई नगरपरिषदेकडून बचत गटातील महिलांसाठी मार्गदर्शन शिबिर





**अंबाजोगाई । पतिनिधी**

**ऑनलाईन मार्केटिंगच्या युगात टिकेल अशा दर्जेदार वस्तूंचे उत्पादन महिला बचत गटांनी करावे असे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासक श्रीमती अर्पिता ठुबे (भा.प्र.से.) यांनी केले. त्या अंबाजोगाई नगरपरिषदेच्या वतीने आयोजित बचत गटातील महिलांना विविध योजनांचे मार्गदर्शन शिबिरात बोलत होत्या.**

नगरपरिषद अंबाजोगाई यांच्या वतीने सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बचत गटातील महिलांना विविध योजनांचे मार्गदर्शन शिबिर हे दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान नगर परिषद अंबाजोगाई व शहर उपजिविका केंद्र (सीएलसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. शहरातील बचत गटातील महिलांना विविध योजनांची माहिती होण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन शिबिर अतिशय उपयुक्त ठरले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक श्रीमती अर्पिता ठुबे (भा.प्र.से.) या होत्या. याप्रसंगी स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे, डीएवाय - एनयुएलएम विभागाचे शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे आणि समीर शेख हे उपस्थित होते. या प्रसंगी अध्यक्षीय भाषणातून उपस्थित महिला बचत गटांच्या कार्यकर्त्या, सभासद यांच्याशी संवाद साधताना श्रीमती अर्पित ठुबे यांनी सांगितले की, महिला बचत गटांनी उत्पादित वस्तू, पदार्थ, साहित्य इत्यादी बाबींचे मार्केटिंग, उत्तमरित्या केले पाहिजे, सध्याचे युग हे ऑनलाईन मार्केटिंगचं आहे, त्यामध्ये सुद्धा आपण महिलांनी विविध प्रकारचे लायसन्स नोंदणी करून तसेच उत्पादित वस्तू दर्जेदार व वस्तूंचे डिझाईनिंग, पॅकेजिंग आकर्षक, उत्कृष्ट कसे राहील याचे प्रॉपर ट्रेनिंग घेऊन आधुनिक स्पर्धेच्या युगामध्ये टिकेल यासाठी पुढे आले पाहिजे. उपस्थित महिलांना त्यांनी विविध स्वरूपाची उदाहरणे देऊन उद्योग व्यवसाय करणेसाठी पुढे आले पाहिजे असे त्या म्हणाल्या. आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये त्यांनी अंबाजोगाई शहरातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शहर उपजीविका केंद्र (सीएलसी) सेंटर सुरू करण्यासाठी महिलांना माझी ज्या-ज्या ठिकाणी मदत लागेल, त्या-त्या ठिकाणी आपल्यासाठी उपलब्ध राहील असे अभिवचन दिले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू,पदार्थ, साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. अंबाजोगाई नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक श्रीमती अर्पिता ठुबे (भा.प्र.से.) यांनी बचत गटाच्या प्रत्येक स्टॉलवर जाऊन उत्पादित वस्तू, पदार्थ, साहित्याची माहिती घेऊन महिलांना प्रोत्साहित केले. या कार्यक्रम प्रसंगी डीएवाय - एनयुएलएम विभाग अंतर्गत कामकाजाची माहिती शहर अभियान व्यवस्थापक दिलीप तांबारे व समीर शेख यांनी सांगितली तसेच रोहिणी कडेकर, अध्यक्ष शहरस्तर संघ यांनी मनोगत व्यक्त करताना सीएलसी सेंटर सुरू करण्याकरीता लागणाऱ्या आवश्यक बाबींची माहिती दिली. यावेळी वर्षा सूर्यवंशी, सचिव शहरस्तर संघ, मीरा जाधव, डीएवाय - एनयुएलएम रिसर्च ऑर्गनायझर (आरओ) पीएमएफएमई योजना, अर्चना धुरंदरे अध्यक्ष गोराई महिला बचत गट इत्यादी महिलांनी आपले मनोगत व्यक्त करून अनुभव कथन केले. तर आरती दहिवाळ, सारिका दहिवाळ, सरिता सातपुते, राणी सातपुते, रत्नमाला तरकसे, शिवकन्या निकम इत्यादी बचतगटातील महिलांनी वस्तू खाद्यपदार्थ तसेच शोभेच्या वस्तू स्टॉल मध्ये ठेवले होते. या कार्यक्रमांमध्ये जिजाऊ स्वयंसहाय्यता महिला बचत गट, आनंदी स्वयंसहाय्यता महिला बचत गट, गोराई स्वयंसहाय्यता महिला बचत गट अर्चना धुरंदरे, आदिशक्ती स्वयं स्वयंसहाय्यता महिला बचत गट आरती दहिवाळ, आईसाहेब स्वयंसहाय्यता महिला बचत गट राणी सातपुते, पल्लवी लखेरा, सारिका सातपुते, श्री त्रिभुवणी महिला स्वयंसाहय्यता बचत गट रेखा मंत्री, यश महिला स्वयंसाहय्यता बचत गट, मुमताज पठाण, एकदंत स्वयंसहाय्यता महिला बचत गट अर्चना सातभाई, कन्यका परमेश्वरी स्वयंसहाय्यता महिला बचत गट शीतल सातभाई व रूपाली सातभाई इत्यादी बहुसंख्य बचत गटातील महिलांनी या प्रदर्शनामध्ये सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अध्यक्षा रोहिणी कडेकर, वर्षा सूर्यवंशी, प्रियंका राऊत, सोनाली शिंदे, निर्गुण हावळे, अर्चना सातभाई, रेखा पांचाळ, शिल्पा पाईकराव इत्यादींनी पुढाकार घेतला.

## सिद्धेश्वर विद्यालयात सामूहिक गायन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात राज्यस्तरीय सामूहिक गायन,सूर्य नमस्कार,पोवाडा श्रमदान स्पर्धा दि ०७ जानेवारी मंगळवार रोजी संपन्न.कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर भारतमाता यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.**

व्यासपीठावर प्रकाश भाऊ दुगड, सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक श्रीकृष्ण अभ्यंकर,श्रीराम इनामदार,सूरज पाटणकर,प्राणेश पोरे,मनोज दादा देवळेकर (कार्यवाह मा.वि.संस्था),मुख्याध्यापक संतोष लिंबकर उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे,या मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राणेश पोरे,शैलेश कंगळे,यांनी केले. मनोज देवळेकर,यांनी सूर्यनमस्कार स्पर्धेचे परीक्षण केले.सूरज पाटणकर, यांनीगीत व पोवाडा गीताचे परीक्षण केले. अध्यक्षीय समारोप करताना मनोज देवळेकर म्हणाले की ज्याप्रमाणे संगितात सर्व स्वर,ताल मात्रा ,लय, एकत्र आले तर सुंदर गीत निष्पन्न होते,त्याच प्रमाणे समाजात एक व्यक्ति दुसर्या व्यक्तिस पूरक ठरला तर निश्चितच समाजा मध्ये सामाजिक सलोखा, सामाजिक समरसता,नांदेल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती पल्लवी कानडे यांनी केले.या प्रसंगी मुख्याध्यापक संतोष लिंबकर,उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे,विभाग प्रमुख रवींद्र खोडवे,पर्यवेक्षक सदाशिव ढगे,कमलाकर झोडगे,परमेश्वर आदमाने अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अपर्णा मुळे तसेच माजी विद्यार्थी कु.श्रेया ठोंगे,सागर देशमुख व,कुणाल कुलकर्णी,यांची उपस्थिती होती.

## मुलांनी पालकांना रस्ता सुरक्षा शिक्षण द्यावे -जिल्हाधिकारी अविनाश पाठक

**बीड । प्रतिनिधी**

**कायद्याचं ऐकण्यापेक्षा पालक आपल्या मुलांचं जास्त ऐकतात असं दिसून आलं आहे त्यामुळे रस्ते सुरक्षेबाबत मुलांनीच आपल्या पालकांना शिक्षण देण्याची आवश्यकता वाटते असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज रस्ता सुरक्षा अभियान २०२५ च्या उद्घाटन प्रसंगी केले.गेवराई येथील लालबहादूर शास्त्री चौकात या अभियानाची आज सुरुवात करण्यात आली यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी रॅली देखील काढली होती.**

रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे उद्घाटन आज माननीय जिल्हाधिकारी बीड अविनाश पाठक यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत बीड , गेवराई येथील न्यायालयाचे न्यायाधीश, गेवराई श्री वानखडे , श्री तोंडे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड तसेच गेवराई तहसीलदार खोमणे,गेवराई नगर परिषद मुख्याधिकारी विक्रम मांडुरके , गेवराई पोलीस निरीक्षक बांगर , न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक आदि कार्यक्रमास उपस्थित होते.सदर कार्यक्रमाची सुरुवात न्यू हायस्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांच्या रॅली पासून सुरू झाली. सदरची रॅली शाळेपासून सुरुवात होऊन मुख्य बाजारपेठेतून जाऊन नगरपरिषद येथे समाप्त झाली. या अनुषंगाने रॅलीमुळे जनजागृती करण्यास मोठा हातभार लागला. मुख्य कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रजलवाने करण्यात आली. त्यानंतर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील माने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये माने यांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत प्रबोधन केले.




तसेच वाहनांमध्ये सेफ्टी नसून खरी सेफ्टी नियमांमध्ये असल्याचे नमूद केले. बीड कार्यालयामार्फत वर्षभरात रस्ता सुरक्षा विषयक विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती दिली. सदर कार्यक्रम प्रभावीपणे राबवल्यामुळे जिल्ह्यामध्ये अपघाताचे प्रमाण दहा टक्क्याने कमी होण्यास मदत झाल्याचे प्रास्ताविकामध्ये सांगितले.त्यानंतर मागील वर्षी बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालया कडून घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वाटपाचा कार्यक्रम झाला. विजेता स्पर्धकास / विद्यार्थ्यास सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र व रोख रक्कम याप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वाटप करण्यात आले. त्यानंतर माननीय दिवाणी न्यायाधीशश्री वानखडे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी नागरिकांना रस्ते सुरक्षा नियमांचे अनुपालन करण्याचे आवाहन केले आणि कायद्यातील तरतुदींचे मार्गदर्शन केले. त्यानंतर माननीय पोलीस अधीक्षक बीड नवनीत कॉवत यांनी मनोगत व्यक्त करताना इतर गुन्ह्यातील मृत्यूपेक्षा अपघातातील मृत्यू हे सात पट जास्त असल्याचे नमूद केले. सदरचे अपघाती मृत्यू कमी करण्याकरता वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत त्यांनी उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. तसेच पश्चिमात्य देशात नागरिक स्वयंशिस्तीने वाहतूक नियमांचे पालन करतात त्याच पद्धतीचे शिस्त आपल्याकडे आवश्यक असल्याचे नमूद केले. अध्यक्षीय भाषणामध्ये मान्य जिल्हाधिकारी बीड अविनाश पाठक यांनी पोलीस आरटीओ यांचे नागरिक कमी प्रमाणात ऐकतात मात्र घरातील मुलांचे नागरिक जास्त ऐकतात या अनुषंगाने मुलांनीच पालकांना शिक्षित करावे असे आवाहन केले. तसेच रस्ता सुरक्षा नियमांच्या पालना विषयी मुलांनीच त्यांच्या पालकांना बाबत करण्याबाबत वचन घेतले. अध्यक्ष भाषणात ते पुढे म्हणाले रस्ता सुरक्षा प्रबोधनाचे कार्यक्रम ग्रामीण भागात देखील मोठ्या प्रमाणात आवश्यक असल्याचे प्रतिपादन करून पहिल्यांदा बीड शहराबाहेर तालुक्याच्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्याचे महत्त्व अध्यक्ष यांनी भाषणात नमूद केले. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बालाजी धनवे सहाय्यक प्रादेशिक पदाधिकारी यांनी केले.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या कृषी

परंतु, वीज कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या शेतीची स्थळ पाहणी करूनच सोलर घेण्यास सक्ती करावी'' असे पाटील यांनी सांगितले.

-------------

### बीडचे अधिकारी त्या वेळच्या

शकतील असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. संतोष देशमुख खून प्रकरणात कोण आहेत हे मला माहिती नाही मग मी कुणावर कसा आरोप करू? आरोपींना शिक्षा झालीच पाहिजे, हे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. संतोष देशमुख हा माझा कार्यकर्ता होता. त्याच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे अशी आपली भूमिका असल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. या प्रकरणात धनंजय मुंडेच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. त्यावर पंकजा मुंडे म्हणाल्या की, त्यावर त्यांच्या पक्षाचे नेते आणि सर्वोच्च नेते उत्तरं देऊ शकतात. माझे काही प्रोटोकॉल आहेत, मी मंत्री आहे. मी यावर काही बोलणे योग्य नाही. पंकजा मुंडे म्हणाल्या की, बीड जिल्ह्याचे वातावरण बिघडले आहे हे बोलतानाही मन जड होत आहे. कारण राज्यभर घडणाऱ्या घटनांचा मी आढावा घेते. बीडचे राजकीय पर्यावरण लवकरच बदलेल, असा मला विश्वास आहे. या कामात माझी सरकारला साथ असेल असेही त्या म्हणाल्या. पंकजा मुंडे म्हणाल्या की, मी छोट्या लेव्हलच्या विषयांना हाताळते. मी पहिले पत्र लिहिले होते आणि जिथे व्यक्त व्हायचे तेव्हा व्यक्त झाले. नागपुरात माध्यमांना देखील माझे मत सांगितले. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांनी सांगितले तपास होईल आणि हयगय करणार नाही. मी मंत्री आहे, अशात आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवला पाहिजे. मोर्चा काढत असू तर आपणच आपल्या सरकारवर अविश्वास दाखवतोय असा त्याच अर्थ होईल, असे त्या म्हणाल्या.

-------------

### आरोपींना मोक्का लावा, बिनभाड्याच्या

सलमान खान सारखी अवस्था झाली पाहिजे, असा टोलाही सुरेश धस यांनी लगावला. मुंबईतील सरपंच आंदोलनात सुरेश धस बोलत होते. ते म्हणाले, गावासाठी चांगल काम करणाऱ्या संतोष देशमुखची हत्या झाली. तो पुढे जाऊन जिल्हा परिषद सदस्यही झाला असता. पण त्याची हत्या केल्यामुळे कोणताही सरपंच समाजसेवेचे काम करण्यासाठी पुढे येणार नाही. त्यामुळे सर्वांनी मिळून संतोष देशमुखच्या कुटुंबीयांना न्याय मिळेल याची काळजी घ्यायला पाहिजे असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी यावेळी केले. काळ गेल्यानंतर काही गोष्टी विसरल्या जातात. पण कितीही काळ गेला तरी संतोष देशमुखला विसरले जाऊ शकते. पण तसे करू नका. शेवटपर्यंत ही गोष्ट मनात ठेवा. देशमुख कुटुंबीयांना कायम पाठिंबा द्या, असे आवाहनही सुरेश धस यांनी केले.

-----------

### खोटे कागदपत्र दाखल करून

प्रयत्न केला. त्याने खरेदी विक्री संघातून कागदपत्रे काढल्यानंतर आपल्या वडीलांच्या नावे खोट्या सहीचा अर्ज दिला असल्याचे आढळून आल्याने त्यांनी फौजदारी न्यायालय गेवराई येथे अॅड.सुभाष निकम यांच्या मार्फत अब्दुल हन्नान युसूफोदीन यांच्या विरुद्ध न्यायलयात अर्ज दाखल केला. न्यायालयाने या प्रकरणी तपास करून अहवाल सादर करण्याचा आदेश गेवराई पोलीस यांना दिले व झालेला साक्ष पुरावा, पोलीस ठाणे गेवराई यांनी दाखल केलेला अहवाल अॅड.सुभाष निकम यांचा युक्तीवाद ग्राह्य धरून प्रथम दर्शनी गुन्हा सिध्द झाला असल्याचे दिसून आले. त्या आधारावर आरोपी हन्नान मोहंमद युसूफोदीन याच्या विरुध्द भादंवीच्या कलम ४२०, ४६५, ४६७,४६८ आणि ४७१ अन्वये केस दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

-------------

### जिल्ह्याच्या विकासाला 'दिशा'

झाली होती. सदरील बैठक ४ वाजेपर्यंत सुरू होती. यावेळी प्रधानमंत्री आवास योजना-शहरी, स्वच्छ भारत मिशन, स्मार्ट सिटी अभियान, अटल मिशन फॉर रिजरवेशन अँड अर्बन ट्रांसफॉर्मेशन, रेल्वे, महामार्ग, डिजीटल भारत भुमी-अभिलेख आधुनिकरण कार्यक्रम, एमएसईबी, टेलीकॉम, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, मध्यान्न भोजन योजना, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बालविकास सेवा योजना, राष्ट्रीय आरोग्य मिशन, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, डीजीटल इंडिया पब्लीक इंटरनेट एक्सेस प्रोग्राम ग्रामपंचायतमध्ये सामान्य सेवा केंद्र उभारणे, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोत्ती अभियान, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आदिंचा आढावा घेण्यात आला. यावेळी रोजगार हमी योजनेतील कामे आणि जलजीवन मिशनची कामे पुर्ण का होत नाहीत, या कारणावरून खा.सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावेळी प्रत्येक अधिकाऱ्यांनी मंजूर असलेली पाच कामे निवडूण अचाणक भेटी देवून कामांची पाहणी करावी आणि होणारा भ्रष्टाचार थांबवावा, अशा सुचनाही यावेळी त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या.

**प्रतिनियक्त्यावर खा.सोनवणेंचे बोट**

जिल्हा परिषदेत प्रतिनियुक्तीवर काम करण्याचा सपाटा लावलेला आहे. अनेक ठिकाणी नियम डावलून पदभार दिलेले आहेत. जे अधिकारी पुढाऱ्यांचे कार्यकर्ते असल्यासारखे वागतात त्यांनाच हे पद दिले असून येत्या आठ दिवसात वर्षानुवर्षे पदावर बसलेले हे लोक बाजुला करा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांना केल्या. यावेळी त्यांनी अनेक अधिकाऱ्यांचे उदाहरण दिले आणि तेच अधिकारीही समोर असल्याने यातली वस्तूस्थिती समोर आली.

**गैरहजर कर्मचाऱ्यांना नोटीस**

जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची बैठक दि.७ रोजी होणार असल्याने सर्व विभाग प्रमुखांना दोन दिवसांपुर्वीच कळविले होते. परंतु असे असतानाही जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, महावितरणचे अधिकारी आणि बीएसएनएलचे अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. या अधिकाऱ्यांना तातडीने नोटीस पाठविल्या जातील, असे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी खा.बजरंग सोनवणे यांना शब्द दिला.

**सीओंकडून खोटी माहिती, जिल्हाधिकारी संतापले**

बीड शहरात अनेक समस्या आहेत. नगर पालिका प्रशासन कामच करत नाही, अशा तक्रारी आहेत. या तक्रारीला धरून खा.सोनवणे यांनी काही प्रश्न उपस्थित करत पालिकेने येणाऱ्या करातून तरी कामे करावीत, अशा सुचना केल्या. यावेळी मुख्याधिकारी निता अंधारे यांनी ९० टक्के कर वसुली होत असल्याचे म्हटले. यावर उपस्थित जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी 'मॅडम खोटे बोलू नका, आयुक्तांच्या बैठकीत २५ टक्केच कर वसुली असल्याचे आपण सांगितले होते,' असे म्हणत सीओंचा खोटारडेपणा उघड केला. शिवाय याच कारणावरून जिल्हाधिकारी चांगलेच संतापले होते.

**अन् सीईओंची बोलती बंद**

बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा आहे. याठिकाणचे लोक रक्ताचे पाणी करून लेकरांना शाळा शिकवित आहेत. त्यांच्यासाठी जिल्हा परिषद हंगामी वसतिगृह चालविते. या वसतिगृहात दर्जेदार आहार दिला जातो का?, असा सवाल खा.बजरंग सोनवणे यांनी केला. इतकेच नाही तर सीईओ यांनी या लेकरांच्या वसतिगृहांना किती वेळा भेट दिली, असा थेट मुद्द्याला हात घातल्यानंतर सीईओ आदित्य जीवने यांची बोलती बंद झाली. शिवाय भेट दिली असेल तर फोटो दाखवा, असेही खासदारांनी म्हटल्याने सीइओंची चांगलीच तारांबळ उडाली.

------------

### दिल्ली विधानसभेसाठी

८३० आहे. दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या मतदार यादीत ही माहिती देण्यात आली आहे. भारत जगातील सर्वात जास्त मतदार असलेला पहिला लोकशाही देश बनणार आहे. सध्या देशात ९९ कोटी नोंदणीकृत मतदार आहेत. यांची संख्या १०० कोटी होणार आहे तर ४८ कोटींहून अधिक महिला मतदार आहेत. असे राजीव कुमार यांनी सांगितले.

-----------

### महाराष्ट्रात राबविले जाणार

मा. मंत्र्यांसाठी अत्यंत सुलभ डॅशबोर्ड उपलब्ध होईल. त्याचबरोबर आवश्यक संदर्भ शोधणे, कृती बिंदू (अॅक्शन पॉइंट) पाहणे आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत पुनरावलोकन करणे सोपे होईल. ई-कॅबिनेटमुळे मंत्रिमंडळ बैठकांचे, निर्णयांचे व त्यासंबंधीच्या दस्तऐवजांचे जतन होईल. मंत्रिमंडळ निर्णय आणि त्यासंबंधीचे संदर्भ शोधणे सहज शक्य होईल. आतापर्यंत होत आलेल्या पारंपरिक मंत्रिमंडळ बैठकांमध्ये येणाऱ्या विविध अडचणींवर या प्रणालीमुळे मात करता येईल. मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणारा प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करणे, तो मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी आणि निर्णयासाठी सादर करणे, त्यावर अंतिम निर्णय व त्याबाबतच्या सर्व नोंदी ठेवणे ह्या सर्व प्रक्रिया सहजरित्या पार पडणार आहेत. हा सुशासनाच्या पूर्ततेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रणालीमुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी कागदपत्रांच्या वितरणासाठी शेवटच्या क्षणी होणारी धावपळ टळून या प्रक्रियेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा तसेच मंत्रिमंडळाचा मोठा वेळ वाचणार आहे.

------------

### मायक्रोसॉफ्टची भारतात ३ अब्ज डॉलर्सची

भारतात आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) आणि त्यांच्या अझूर क्लाउड-कॉम्प्युटिंग सेवांची क्षमता वाढवण्यासाठी कंपनीकडून ही गुंतवणूक करण्यात येणार असल्याचे देखील नादेला यांनी स्पष्ट केले आहे.

**२०३० पर्यंत भारतात १ कोटी लोकांना प्रशिक्षण**

भारतात गिटहबवर १.७ कोटी डेव्हलपर्स आहेत. २०२८ पर्यंत सॉफ्टवेअरमधील हा सर्वात मोठा प्लॅटफॉर्म असेल. भारतातून ३०,५०० हून अधिक एआय प्रकल्प विकसित केले जात आहेत. मायक्रोसॉफ्ट २०३० पर्यंत भारतात १ कोटी लोकांना एआय कौशल्यांचे प्रशिक्षण देणार असल्याचेही नादेला म्हणाले.

-------------

### आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम

इंडियन रोड काँग्रेसच्या () गाईड लाइन्स प्रमाणे काम केले नाही. इंडियन रोड काँग्रेसच्या () च्या गाईड लाइन्स नुसार बायपासला क्रॉस होणार्या राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा मार्ग याठिकाणी स्लीप सर्विस रोड करणे आवश्यक आहे. परंतु बीड बायपासवर बीड-परळी रोड हा राष्ट्रीय महामार्ग, बीड-माजलगाव हा राज्य महामार्ग व बीड-इमामपूर हा प्रमुख जिल्हा मार्ग असे तीन महत्वाचे रस्ते क्रॉस होतात. तसेच बीड शहरात महामार्गावरून प्रवेश करताना असलेले छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक या दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल करण्यात आलेला नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याठिकाणी आवश्यक असलेल्या बाबींचे पालन न केल्यामुळे आत्तापर्यंत दोन्ही चौकांमध्ये एकूण १३ लोकांचा बळी गेल्याची नोंद आहे. अनेक लोकांना कायमचे अपंगत्व आले आहे. तर दरदिवस अपघात होऊन असंख्य लोक जखमी होत आहेत. सदरील बाबी नागरिकांच्या, प्रवाशांच्या आणि वाहतुक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय सडक परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना ४ डिसेंबर २०१९ रोजी, बीड बायपासवर शहराचे प्रवेशद्वार असलेल्या दोन्ही ठिकाणी म्हणजेच महालक्ष्मी चौक व छत्रपती संभाजी महाराज चौक येथे उड्डाणपूल तसेच बीड-परळी रोड, बीड-माजलगाव रोड व बीड-इमामपूर या तीन ठिकाणी स्लीप सर्विस रोड मंजूर करण्याबाबत पत्रव्यवहार केला. यावर मा.नितीन गडकरी यांनी १४ जुलै २०२० रोजी पत्राद्वारे सदरील कामे करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला सुचविले होते. त्यानंतर आ.संदीप क्षीरसागर यांनी सदरील कामांच्या मंजुरीची शिफारस राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी अशी वारंवार मागणी केली. तसेच माजी आ.सय्यद सलीम यांनीही बायपासवर दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि तीन ठिकाणी स्लीप सर्विस रोड मंजूरीसाठी पत्रव्यवहार करत पाठपुरावा केला. परंतु राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून याबाबत दखल घेतली जात नसल्याने शेवटी माजी आ.सय्यद सलीम यांनी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ११७६/२०२४ व पिटीशन क्रमांक ८८०८/२०२४ दाखल केली. या प्रकरणात औरंगाबाद खंडपीठात दि.२५ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायमूर्ती रविंद्र व्ही. घुगे व न्यायमूर्ती वाय.जी.खोब्रागडे यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांचे म्हणने राष्ट्रीय महामार्गाचे मुख्य कार्यालय, द्वारका, नवी दिल्ली येथे पाठविले असून या कामासाठी तांत्रिक समिती देखील स्थापन केली आहे. तसेच मार्च २०२५ पर्यंत बीड बायपासवर छत्रपती संभाजी महाराज चौक व महालक्ष्मी चौक याठिकाणी उड्डाणपूल व इमामपूर रोडच्या स्लीप सर्विस रोडला मंजुरी देऊ असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून न्यायालयात सांगण्यात आले. परंतु न्यायालयाने या ठिकाणी होत असलेले अपघात आणि सुरक्षेच्या प्रश्नाची गंभीर दखल घेत डिसेंबर २०२४ पर्यंत तीनही कामांना मंजुरी द्या असे निर्देश दिले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे बीड बायपासवरील अपघात आणि सुरक्षेचा प्रलंबित असलेला मोठा प्रश्न मार्गी लागणार असून आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. दरम्यान या प्रकरणात याचिकाकर्ते माजी आ.सय्यद सलीम यांच्या वतीने अॅड.सय्यद तौसिफ यासीन यांनी काम पाहिले.




# टोमॅटोची भाव घसरले : सहा दिवसात दरात ९ रुपयांची घसरण

## बळीराजाला फटका तर ग्राहकांना दिलासा

देशातील ग्राहकांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, जानेवारी महिन्यात बटाटे आणि टोमॅटोच्या किमतीत ३ ते ९ रुपयांपर्यंत घसरण झाली आहे. याचा फटका मात्र, शेतकऱ्यांना बसला आहे. तर दुसरीकडे जानेवारी महिन्यात कांद्याच्या भावात ८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. नोव्हेंबरच्या तुलनेत डिसेंबर महिन्यात घरातील खाद्यपदार्थाच्या किमती ३ टक्क्यांनी स्वस्त झाल्या आहेत. बटाटे आणि टोमॅटोच्या भावात झालेली घसरण हे त्याचे प्रमुख कारण आहे. आता हाच ट्रेंड जानेवारीतही कायम राहण्याची शक्यता आहे. जानेवारी महिन्यात बटाटे आणि टोमॅटोचे दर तीन ते नऊ रुपयांनी स्वस्त झाले आहेत. दुसरीकडे जानेवारी महिन्यात कांद्याच्या दरात आठ टक्क्यांनी वाढ झाली आहे. जे कमी होण्याची अपेक्षा आहे. जानेवारीच्या पहिल्या ६ दिवसांत बटाटे, कांदे आणि टोमॅटोच्या किमतीत किती घसरण झाली आणि किती वाढ झाली हेही पाहू.

ग्राहक मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, देशाची राजधानी दिल्लीत बटाट्याच्या किंमतीत १० टक्क्यांनी घसरण झाली आहे. ३१ डिसेंबर रोजी दिल्लीत बटाट्याची किरकोळ किंमत ३० रुपये प्रति किलो होती. जी ६ जानेवारीला २७ रुपये कमी झाली आहे. याचाच अर्थ दिल्लीत



बटाट्याच्या किमतीत १० टक्के घट झाली आहे. देशातील सरासरी किमतींबाबत बोलायचे झाले तर ३१ डिसेंबर रोजी देशात बटाट्याचा भाव ३३.८४ रुपये प्रति किलो होता. जे ३३.३२ रुपये प्रति किलोपर्यंत कमी झाला आहे. तज्ज्ञांच्या मते, येत्या काही दिवसांत देशातील सरासरी किमती आणखी घसरण्याची शक्यता आहे.

टोमॅटोच्या दरात कमालीची घट

दुसरीकडे टोमॅटोच्या दरात मोठी घसरण झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, जानेवारी महिन्यात दिल्लीत टोमॅटोच्या दरात प्रतिकिलो ९ रुपयांची घसरण झाली आहे. ३१ डिसेंबरला टोमॅटोचा भाव ३७ रुपये किलो होता. ६ जानेवारीला टोमॅटोचे दर २८ रुपये किलोवर आले आहेत. म्हणजेच टोमॅटोच्या किमती २४.३२ टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. जर आपण देशाबद्दल बोललो तर ३१ जानेवारी रोजी देशात टोमॅटोची सरासरी किंमत ३९.०८ रुपये प्रति किलो होती. जे प्रति किलो ३४.९७ रुपये कमी झाले. याचा अर्थ असा की, ६ दिवसांत देशातील सरासरी भावात ४.११ रुपये प्रति किलोची घट झाली आहे.

कांदा महागला

जानेवारी महिन्यात आतापर्यंत कांद्याच्या दरात वाढ झाली आहे. कांद्याचे भाव ६ दिवसांत ८ टक्क्यांनी महागले आहेत. ३१ डिसेंबरला दिल्लीत कांद्याचा भाव ३७ रुपये किलो होता, तो वाढून ४० रुपये किलो झाला. याचाच अर्थ कांद्याच्या दरात तीन रुपयांनी वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, ३१ डिसेंबर रोजी देशातील सरासरी किमती ३३.८४ रुपये प्रति किलो होत्या, त्या ३३.३२ रुपये प्रति किलोवर आल्या. याचा अर्थ देशाच्या सरासरी किमतींमध्ये थोडीशी घट झाली आहे.

डिसेंबरमध्ये टोमॅटो किती स्वस्त?

क्रिसिलच्या अहवालानुसार, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातमधून आलेल्या ताज्या पुरवठ्यामुळे टोमॅटोचे भाव १२ टक्क्यांनी घसरले,आहेत. तर बटाट्याचे भाव दोन टक्क्यांनी घसरले आहेत. वार्षिक आधारावर बोलायचे झाले तर डिसेंबरमध्ये टोमॅटोच्या भावात २४ टक्क्यांनी वाढ झाल्याने टोमॅटोचा भाव ४७ रुपये किलो झाला होता. बटाट्याच्या दरात ५० टक्क्यांनी वाढ झाली असून ३६ रुपये किलोचा भाव आहे.

# कुक्कुटपालनात वनराजा कोंबडीला विशेष मागणी

भारतात गेल्या अनेक वर्षांपासून शेती समवेत शेती पूरक व्यवसाय मोठ्या प्रमाणात केले जाऊ लागले आहेत. शेतीपूरक व्यवसायातून शेतकऱ्यांना चांगली कमाई देखील होत आहे. कुक्कुटपालन हा देखील एक प्रमुख शेती पूरक व्यवसाय आहे. आजकाल ग्रामीण भारतात कुक्कुटपालनाची क्रेझ वाढत आहे. मांसाच्या मागणीत सातत्याने होणारी वाढ हे त्याचे प्रमुख कारण आहे. त्याचप्रमाणे कुक्कुटपालन हा असा व्यवसाय आहे ज्यामध्ये शेतकऱ्यांना कमी खर्चात जास्त नफा मिळतो. शेतकरी त्यांच्या घरामागील अंगणात म्हणजे परसदारात देशी कोंबडी पालन करून चांगला नफा कमवू शकतात. खरं पाहता, ब्रॉयलर कोंबड्यांपेक्षा देशी कोंबडीची मागणी जास्त आहे. त्याचे मांस देखील अधिक चवदार आणि आरोग्यदायी असते. यामुळे गावरान कोंबडी पालन अलीकडे मोठ्या प्रमाणात केले जाऊ लागले आहे. वनराजा कोंबडी ही भारतातील प्रमुख देशी किंवा गावरान जात आहे. ही कोंबडी मांसासाठी पाळले जाते. त्याची अंडी पौष्टिक असल्याने महाग विकली जातात. हे ग्रामीण भागात अगदी सहजपणे पाळले जाऊ शकते. या जातींचे कोंबडी पालन व्यावसायिकरित्या करून केवळ ५०० कोंबड्यांपासून १ लाखांपर्यंत कमाई होऊ शकते.वनराज कोंबडीची वैशिष्ट्ये : वनराजाची कोंबडीची जात तपकिरी रंगाची अतिशय आकर्षक आहे. यात रोगांचा प्रतिकार जास्त असतो. त्याचे मांस अतिशय चवदार मानले जाते. वनराजाच्या कोंबडीच्या मांसात फारशी चरबी नसते. वनराजा कोंबडीची जात थोडी भांडखोर आहे. ही कोंबडी खुल्या पद्धतीने पालनासाठी उत्तम मानली जाते. एका पिलाचे वजन सुमारे ३४ ते ४० ग्रॅम असते. त्याचे वजन ६ आठवड्यांत ७०० ते ८५० ग्रॅम पर्यंत बनते. वनराजाची कोंबडी १७५ ते १८० दिवसांत अंडी घालू लागते. त्याच्या अंड्यांतून ८० टक्के पिल्ले बाहेर येतात. वनराजा कोंबडी एका वर्षात ९० ते १०० अंडी घालू शकते. वनराजा चिकनची किंमत: वनराजाच्या कोंबड्यांना बाजारात चांगला भाव मिळतो. एक किलो वनराजा कोंबडीची किंमत ५०० ते ६०० रुपयांपर्यंत असते.



# संगमनेरी शेळीची शेतकऱ्यांना साथ

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या संगमनेरी सुधार प्रकल्प शेळीपालकांसाठी दिशादर्शक ठरला आहे. या प्रकल्पातून जातिवंत शेळी आणि बोकडांचा पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे संगमनेरी शेळीपालन शेतकऱ्यांना आर्थिक प्रगतीची दिशा मिळाली आहे. योग्य पद्धतीने संगोपन होत नसल्याने संगमनेरी शेळी नामशेष होत चालली होती. हे ओळखून महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये २००२ मध्ये अखिल भारतीय समन्वित संगमनेरी शेळी सुधार प्रकल्पाला सुरुवात झाली. या ठिकाणी संगमनेरी शेळीचे संवर्धन, संशोधन करून पैदास वाढविण्यात आली. कुलगुरू डॉ. प्रशांतकुमार पाटील, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, पशुसंवर्धन विभागाचे प्रमुख डॉ. दिनकर कांबळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विष्णू नरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेरी शेळी पालनासंदर्भात विविध उपक्रम सुरू आहेत.



संगमनेरी शेळीने दिला पाच करडांना जन्म

प्रकल्पातील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विष्णू नरवडे म्हणाले, की राहुरी, संगमनेर, श्रीरामपूर, नाशिक जिल्ह्यांतील सिन्नर आणि पुणे जिल्ह्यातील बेल्हा परिसरातील शेतकऱ्यांकडे संगमनेरी शेळ्या आहेत. आमच्या प्रकल्पाचे माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. संजय मंडकमाले यांच्या पुढाकाराने मूळ गुणधर्म व वेगळ्या पद्धतीचा अभ्यास करून संगमनेरी शेळीचे जतन होत असलेल्या भागामध्ये आम्ही सर्वेक्षण केले. यातून तीन हजार शेळ्यांची नोंद झाली. परंतु या शेळ्यांमध्ये अन्य जातींचा संकर झाल्याने मोजक्याच शेळ्या शुद्ध वंशाच्या होत्या. यातील निवडक दिडशे शेळ्या आणि दीडशे बोकडांची निवड करून पाच वर्षे संवर्धन आणि संशोधन करण्यात आले. यातून जातिवंत शेळ्यांची संख्या वाढवली. आम्ही संगमनेरी शेळी पालन करणाऱ्या शेतकऱ्यांना जातिवंत बोकडांचा मोफत पुरवठा केला. यातून गेल्या वीस वर्षांत सुमारे २५ हजार शेतकऱ्यांकडे ६५ हजारांपेक्षा अधिक शेळ्यांचे संगोपन सुरू आहे. यातूनच शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होत आहे.

संशोधनाचा फायदा

शेळीचे दूध, वजन वाढ झाली. तसेच जुळी करडे देणाऱ्या शेळ्यांची संख्या वाढली. वर्षभरात साधारणपणे शेळी सव्वीस किलोपर्यंत वाढते. बोकडाचे वजन ३० किलोपासून ६५ किलोपर्यंत वाढते. तीनपासून पाचपर्यंत करडांची संख्या गेली. 'प्रथम शेतकरी' प्रकल्पातील शेतकऱ्यांना पैदाशीसाठी बोकड आणि शेळ्यांचा पुरवठा. चंदनापुरी (ता. संगमनेर) येथील विकास रहाणे आणि सिन्नर तालुक्यातील गणेश खाडे यांच्याकडे सुधारित तंत्रज्ञानातून विशेष 'स्टार्टअप' सुरू होत आहे. हिरवगाव पावसा (ता. संगमनेर) येथील अनिल गोफणे यांच्या एका शेळीने पाच आणि दोन शेळ्यांनी प्रत्येकी चार पिलांना जन्म दिला आहे.

# गव्हाची आंतरमशागत अन् पाणी व्यवस्थापन

पाणी व्यवस्थापन : भारी जमिनीकरिता १८ दिवसांच्या अंतराने ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. मध्यम जमिनीसाठी १५ दिवसाच्या अंतराने ७ पाळ्या द्याव्यात तर हलक्या जमिनीस १०-१२ दिवसाच्या अंतराने ८ ते १० पाळ्या द्याव्यात. परंतु पीक वाढीच्या महत्वाच्या अवस्था व या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास उत्पादनावर परिणाम होतो.

मुकुटमुळे फुटण्याच्या वेळी (पेरणीनंतर २१-२५ दिवसांनी): या वेळी जमिनीत पाण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे मुकुटमुळे कमी फुटतात. फुटलेल्या मुळ्या जास्त पसरत नाहीत. फुटवे कमी येतात. गहू काढणीस लवकर येतो व उत्पादनात घट येते. फुटवे फुटण्याची अवस्था (पेरणी नंतर ५५-६० दिवसांनी): ओंब्या कमी बाहेर पडतात. बाहेर पडलेल्या ओब्यांची लांबी कमी होते व पर्यायाने उत्पादनात घट येते.

पीक फुलोरयास येणे (पेरणी नंतर ७०-८०- दिवसांनी): परागसिंचन कमी होऊन दाण्याची संख्या घटते व पर्यायाने उत्पादन घटते.

दाण्यात चिक भरण्याची वेळ (पेरणीनंतर ९०-१०० दिवसांनी): या अवस्थेत दाणे पोसतात, त्यांचा आकार वाढतो. परंतु जमिनीत ओलावा कमी असल्यास दाण्याचा आकार लहान होतो व वजन कमी होते.



दाणे टणक होण्याची अवस्था (पेरणी नंतर ११० दिवसांनी):या अवस्थेत जमिनीत ओलावा कमी असल्यास दाण्याचा आकार कमी होतो.दाण्यांवर सुरकुत्या पडून प्रत निकृष्ट होते व पर्यायाने उत्पादनात घट येते.

ज्या शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध नाही अशा परिस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. पाणी अपुरे असल्यास व एक ते पाच पाण्याच्या पाळ्या देणे शक्य असल्यास पुढील प्रमाणे पाणी द्यावे. चार पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी २१ ते २५ दिवसांनी, दुसरे ५५-६० दिवसांनी तर तिसरे ७०-८० दिवसांनी दयावे तर चौथे पाणी ९०-१०० दिवसांनी द्यावे.

आंतरमशागत : पेरणी नंतर २१-३० दिवसांनी एक खुरपणी आणि कोळपणी करून तणांचा बंदोबस्त करावा. गव्हात चांदवेल, हरळी यासारख्या तणांचा प्रादुर्भाव होतो, त्याकरिता जरुरी प्रमाणे एक किंवा दोन खुरपणी, तसेच कोळपणी करून जमीन मोकळी करावी. गहू पिकातील अरुंद पानांचे आणि रुंद पानांच्या तण नियंत्रणासाठी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी दर हेक्टरी आयसोप्रोटयुरॉन (५०%) दोन ते तीन किलो किंवा मेटासल्फूरॉन मेथाईल (२०%) हेक्टरी २० ग्रॅम किंवा २,४- डी (सोडियम) अधिक २% युरिया ६०० ते १२५० ग्रॅम ६०० ते ८०० लिटर पाण्यातून मिसळून गव्हाच्या दोन ओळीत फवारावे. तणनाशक फवारल्या नंतर १० ते १२ दिवस पाणी देवू नये. तणनाशकाच्या फवारणीसाठी फ्लॅटफॅन किंवा फ्लडजेट नोझल वापरावे.तसेच फवारणीसाठी साधा नॅपसॅक पंप वापरावा.पॉवर स्प्रे वापरू नये.बागायती वेळेवर पेरलेल्या गव्हास खुरपणी झाल्यानंतर (सर्वसाधारणपणे २१-३० दिवसांनी) प्रती हेक्टरी ६० किलो नत्र (१३० किलो युरिया), बागायती उशिरा पेरलेल्या गव्हास प्रती हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) द्यावा. पीक ५५ ते ७० दिवसांचे असताना १९:१९:१९ या विद्राव्य खताची दोन वेळा फवारणी करावी. (१० लिटर पाण्यात ५० ग्रॅम १९:१९:१९)

दाणे भरण्याच्या अवस्थेत दोन टक्के युरियाची फवारणी करावी. (१०लि. पाण्यात २०० ग्रॅम युरिया).




### महत्वाच्या घटना

१८३५ : अमेरिकेवरील राष्ट्रीय कर्ज पहिल्यांदाच आणि एकदाच शून्य झाले.
१८८० : सत्यशोधक समाजाच्या संस्काराने लावलेली लग्ने कायदेशीर असल्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय. ब्राम्हणेतर लोकही लग्नाचे पौरोहित्य करु शकतात हे न्यायालयाने मान्य केले.
१८८९ : संख्यात्मक सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी डॉ. हर्मन होलरिथ यांना अमेरिकेत गणकयंत्राचे पेटंट मिळाले. अमेरिकेच्या जनगणनेत १८९० मध्ये या गणकयंत्राचा उपयोग करण्यात आला.
१९२९ : नेदरलँड्स आणि वेस्ट इंडिज यांच्या मध्ये पहिल्यांदा टेलिफोन वर संपर्क झाला.
१९४० : दुसरे महायुद्ध - ब्रिटनने अन्नधान्यावर नियंत्रण (रेशनिंग) आणले.
१९४७ : राजस्थान विद्यापीठाची स्थापना झाली.
१९५७ : गोव्याच्या लष्करी न्यायालयात मोहन रानडे यांच्यासह तेवीस जणांना २४ वर्षांची शिक्षा झाली. भारत सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे गोवा स्वतंत्र झाल्यानंतरही अनेक वर्षे ते पोर्तुगालमधील तुरुंगात खितपत पडून होते. अखेर तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री अण्णादुराई यांनी पोपकडे केलेल्या मध्यस्थीमुळे १९६९ मध्ये त्यांची सुटका झाली. त्यांना गोवा पुरस्कार (१९८६), पद्मश्री (२००१) व सांगली भूषण (२००६) इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आले.
१९५८ : १४ व्या वर्षाच्या बॉबी फिशर ने अमेरिकेची चेस चॅम्पियनशिप जिंकली होती.
१९६३ : लिओनार्डो डा व्हिन्सिच्या 'मोनालिसा'चे अमेरिकेत प्रथमच नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट, वॉशिंग्टन येथे प्रदर्शन करण्यात आले.
१९७१ : पाकिस्तान चे राष्ट्रपती झुल्फिकार अली भुट्टो यांनी नेता शेख मुजीबुर रहमान यांची जेल मधून सुटका करण्यात आली.
१९७३ : रशियाने ''मिशन ल्यूना २१'' ला स्पेस मिशनचे प्रक्षेपण केले.
२००० : लता मंगेशकर यांची १९९९ साठीच्या एन.टी. रामाराव राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड
२००१ : भारत व व्हिएतनाम दरम्यान सांस्कृतिक, पर्यटन आणि अणूऊर्जेचा शांततेसाठी वापर करण्याच्या तीन करारांवर सह्या झाल्या.
२००९ : ४,३०० वर्षाआधीची रानी सेशेशेट ची इजिप्त येथे ममी सापडली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०९ : ला भारतीय कादंबरीकार आशापूर्णा देवी यांचा जन्म.
१९२४ : गीता मुखर्जी - स्वातंत्र्य सेनानी, कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या, लोकसभा सदस्य (मृत्यू: ४ मार्च २०००)
१९२५ : राकेश मोहन - हिन्दी नाटककार (मृत्यू: ५ डिसेंबर १९७३)
१९२६ : केलुचरण महापात्रा - प्रसिद्ध ओडिसी नर्तक (मृत्यू: ७ एप्रिल २००४)
१९२९ : सईद जाफरी - अभिनेता
१९३५ : एल्व्हिस प्रिस्टले - अमेरिकन गायक, गिटारवादक, अभिनेता आणि 'किंग ऑफ द रॉक अँड रोल' (मृत्यू: १६ ऑगस्ट १९७७)
१९३६ : ज्योतिंद्रनाथ दिक्षीत - परराष्ट्रसचिव, मुत्सद्दी व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (मृत्यू: ३ जानेवारी २००५)
१९३९ : नंदा - अभिनेत्री
१९४२ : स्टिफन हॉकिंग - इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ आणि लेखक
१९८६ : प्रसिद्ध अभिनेता नवीन कुमार गोवडा उर्फ यश यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६४२ : गॅलेलिओ गॅलिली - इटालियन खगोलशास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १५ फेब्रुवारी १५६४)
१८२५ : एली व्हिटनी - कापसाच्या जिनिंग मशीनचा संशोधक (जन्म: ८ डिसेंबर १७६५)
१८८४ : केशव चंद्र सेन - ब्राम्हो समाजातील एक थोर पुरूष, समाजसुधारक आणि लोकसेवक (जन्म: १९ नोव्हेंबर १८३८)
१९४१ : लॉर्ड बेडन पॉवेल - बालवीर चळवळीचे प्रणेते (जन्म: २२ फेब्रुवारी १८५७)
१९६६ : बिमल रॉय - प्रथितयश दिग्दर्शक (जन्म: १२ जुलै १९०९)
१९६७ : डॉ. श्रीपाद कृष्ण बेलवलकर - प्राच्यविद्यातज्ञ, संस्कृत पंडित. अमेरिकेच्या हॉर्वर्ड विद्यापीठात भवभूतीच्या उत्तर रामचरितावर प्रबंध लिहून त्यांनी डॉक्टरेट मिळवली. (जन्म: १० डिसेंबर १८८० नरसोबाची वाडी, शिरोळ, कोल्हापूर)
१९७३ : नारायण भिकाजी तथा 'नानासाहेब' परुळेकर - 'सकाळ' वृत्तपत्राचे संस्थापक संपादक, प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचे अध्यक्ष व भारतीय पत्रकारितेचे पितामह, स्वच्छ समाजदृष्टी, उक्ती व कृती यातील करडी शिस्त या असाधारण गुणांमुळे नानासाहेब परुळेकर हे स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी पत्रकारितेतील सदैव स्मरणात रहावे असे व्यक्तिमत्त्व ठरले. त्यांना पद्मभूषण सन्मानाने गौरविण्यात आले होते. 'निरोप घेता' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (जन्म: २० सप्टेंबर १८९८)
१९७६ : चाऊ एन लाय - चीनचे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ५ मार्च १८९८)
१९८४ : पहिल्या भारतीय महिला वैमानिक सुषमा मुखोपाध्याय यांचे निधन.
१९८७ : माजी भारतीय क्रिकेटर नाना जोशी यांचे निधन.
१९९२ : आनंद मासिकाचे माजी संपादक दं. प्र. सहस्रबुद्धे यांचे निधन.
१९९४ : ६८ वे शंकराचार्य परमाचार्य श्री. चंद्रशेखर सरस्वती यांचे निधन.
१९९५ : मधू लिमये - स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, समाजवादी नेते व राजकारणी (जन्म: १ मे १९२२)
१९९६ : फ्रान्सवाँ मित्राँ - फ्रान्सचे २१ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २६ आक्टोबर १९१६)
२००३ : भारतीय कीटकशास्त्रज्ञ महादेव सुब्रमण्यम मनी यांचे निधन.

## थोडक्यात



### रेझिंग डे निमित्त विद्यार्थ्यांना दिली पोलिसांच्या शस्त्राविषयी माहिती

बीड : रेझिंग डे २०२५ निमित्त चंपावती माध्यमिक शाळेतील आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना पोलिसांच्या शस्त्राविषयी, वाहतुकीच्या नियमाविषयी, महिलांच्या संरक्षणाविषयी माहिती देण्यात आली. रेझिंग डे २०१५ निमित्त पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दिनांक ७ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांना पोलीस शस्त्राविषयी, पोलिसांच्या कामकाजाविषयी माहिती, महिलांच्या संरक्षणाविषयी वाहतुकीच्या नियमाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये पोलिसांचे शस्त्र रायफल ,पिस्टल, डॉग स्कॉड पथक, अंगुली मुद्रा संशोधक पथक, वाहतूक शाखेची माहिती, सायबर पोलीस ठाणे विषयी माहिती, याशिवाय हेल्पलाइन नंबर, महिलांच्या कायद्याबाबत माहिती, मुलींच्या संरक्षणाविषयी माहिती सविस्तरपणे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर,वसुदेव मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी आठवी व नववीचे जवळपास दीडशे विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी मुख्याध्यापक संजय चौसाळकर, पोलीस उपनिरीक्षक बजरंग कुटुंबरे ,पोलीस आमलदार, शाळेतील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे अभियान अनेक शाळेत राबवण्यात येणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी दिली.

### प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बैठक

बीड : प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकी मध्ये जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले यांनी मृद व जलसंधारण विभागाच्या १ जानेवारी २०२५ रोजी च प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० या योजनेअंतर्गत पाणलोट यात्रेचे आयोजन चे चे वाचन करण्यात आले. सदरील बैठकी मध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे उपस्थित होते. सोबत विभागाचे पवार तसेच बीड, गेवराई, राजेंद्र सांगळे आष्टी पाटील या तिन्ही पाणलोट प्रकल्प प्रकल्पाचे या बैठकीस उपस्थित होते .सोबत , या विभाग चे तालुका अभियान व्यवस्थापक गोसावी, तसेच प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजनेतील साळवे, सिस्टीम अडमीन गोंडे , बीड प्रकल्प बाबासाहेब कोकाटे कृषी तज्ञ, मीरा खरात समूह संघटक, ललिता मांडल समूह संघटक, अनिकेत तुपे सिव्हिल तसेच विभाग चे राख , दालिंबकर, भोंडवे, हजारे, तसेच सर्व विभागाचे प्रमुख या बैठकीस उपस्थित होते.

### अनिल वडघुले राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराने सन्मानित

नाशिक । प्रतिनिधी

पत्रकार दिनाच्या निमित्ताने आचार्य बाळशास्त्री जांभेकर संघ नाशिक यांच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना हा



पुरस्कार देण्यात येतो या वर्षीचा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार पिंपरी-चिंचवड येथिल पत्रकार संघ अध्यक्ष अनिल वडघुले यांना राजकिय, सामाजिक ,कला व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कारासाठी निवड केल्याचे नाशिक येथील बाळशास्त्री जांभेकर राष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष डॉ महेंद्र देशपांडे यांनी अनिल वडघुले यांची निवड केल्याचे कळविले होते. हा पुरस्कार वितरण समारंभ पत्रकार दिनानिमित्त सि बी एससी सभागृह नाशिक येथे संपन्न झाला. यावेळी दै सामना चे संपादक सुरत चे मनोज शिंदे, झी २४ तासचे संपादक कमलेश सुतार, गुणवंत कामगार कल्याण मंडळ अध्यक्षा भारती चव्हाण, अनेक उद्योग पति व मान्यवर उपस्थित होते.

### बीड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने दर्पण दिन साजरा

बीड : बीड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने माहिती कार्यालयात बीड सोमवारी ( दि.६ जानेवारी ) दर्पण दिन मोठ्या साजरा करण्यात आला. दर्पण दिनाचे औचित्य साधून मराठी पत्रकार परिषद मुंबई सलग्नित बीड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्यावतीने माहिती कार्यालयात सोमवारी सकाळी ११.३० आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा माहिती अधिकारी दैठणकर, यांच्या उपस्थितीत मराठी पत्रकार परिषदेचे सुभाष चौरे विभागीय समन्वयक संभाजीनगर विभाग, विलास डोळसे राज्य कार्यकारिणी सदस्य, रवी उबाळे मराठवाडा सचिव, विशाल साळुंके बीड जिल्हाध्यक्ष, अभिमन्यु घरत जिल्हा समन्वयक, संजय हंगे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख, राजेंद्र होळकर संपादक, मंगेश निटुरकर बीड तालुका निमंत्रक,लक्ष्मण नरनाळे बीड तालुका समन्वयक,दत्ता आजबे बीड तालुका अध्यक्ष, रेहान शेख बीड तालुका कार्याध्यक्ष, प्रशांत लहुरीकर बीड तालुका कोषाध्यक्ष, प्रचंड सोळंके बीड तालुका सरचिटणीस, सर्व सदस्य मराठी पत्रकार परिषद बीड व आदी पत्रकार, संपादक यावेळी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्याप्रारंभी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर छतीसगड येथील पत्रकार स्व. मुकेश चंद्राकर, यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



# धारूर येथील जमिनीचा बेकायदेशीर फेरफार रद्द करा

## सय्यद सलीमबापू यांचे उपविभागीय कार्यालयासमोर उपोषण

माजलगाव। प्रतिनिधी

धारूर येथील सर्वे नंबर ५५६,६१० या मजीद मोगलानी मिळकती आहेत.नियमानुसार याची अदलाबदली होत नाही.परंतु यात खोट्या दस्तऐवज दाखवून तहसीलदार मंडळ अधिकारी व तलाठी यांनी सदरील जमिनीचा फेरफार केला आहे.तो तात्काळ रद्द करण्यात यावा या मागणीसाठी ६ जानेवारी रोजी माजलगाव उपविभागीय कार्यालयासमोर आंबेडकरी विचार मोर्चाचे अध्यक्ष सय्यद सलीमबापू,एडवोकेट ए.एन. सय्यद यांनी उपोषण सुरू केले आहे.

सदरील उपोषणकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे कि, धारूर येथील सर्वे नंबर ५५६ व ६१० या मजीद मोगलानी मिळकती आहेत.याची नोंद महसूल अभिलेखाच्या खासरा पत्रक, पहानी पत्रक,नमुना नंबर ९ मध्ये आहे.राज्य



शासनाच्या राजपत्र नियमानुसार याची अदलाबदल होत नाही.असे असतानाही सदरील मिळकत समस्त मजीद बीडची मिळकत आहे,असे खोटे भासऊन बेकायदेशीर फेरफार केला आहे. यात खाजगी लोक,पंच कमिटी मधील लोकांची बेकायदेशीर नावांची नोंद घेतलेली आहे.या बेकायदेशीर प्रकारात संबंधित तहसीलदार,मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह उपविभागीय कार्यालयाचाही दोष दिसून येत आहे.यापूर्वीही सदरील बाब आम्ही शासनाच्या निर्दशनास आणून देण्याचा प्रयत्न केला आहे.सदरील फेरफार रद्द करण्याचे निवेदन दिले आहे,विनंती केली आहे.परंतु याची दखल घेतली जात नाही.सदरील प्रकारात भूमाफियां सोबत शासनाच्या अधिकाऱ्यांनी आपले हात ओले केले असल्याचा संशय आहे.त्यामुळे सोमवार दि.६ रोजी आंबेडकरी विचार मोर्चाचे अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली एडवोकेट ए.एन. सय्यद,शेख इस्माईल मासूम,शेख महमूद शेख महबूब,समीर सलीम सिद्दिकी यांनी उपविभागीय कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

## बनावट एनए दाखवून १४ कोटींचा गंडा घातल्याचा आरोप

जालना। प्रतिनिधी

शेतजमीन ही अकृषक केली आहे. त्याचा बनावट एनए दाखवून प्लॉटिंग पाडून महिनेवारी प्लॉटिंगचे आमिष दाखवून रोख रकमेने प्लॉटची विक्री केली. प्लॉट नावावर करण्यासाठी गेल्यानंतर एनए दस्तऐवजच बनावट असल्याचे पुढे आले आहे. यामुळे शासनासह शेकडो नागरिकांचीही फसवणूक झाल्याचा आरोप आहे.

जालना तालुक्यातील सिंधी काळेगाव परिसरातील शेतजमीन गट क्रमांक १६६ मिळकतीचे तर सावरगाव परिसरातील शेतजमीन गट क्रमांक ८४ व ८५ या मिळकतीचे बनावट अकृषक परवाने दस्तऐवज आदेश तयार केले आहेत. तक्रारी आल्यानंतर या प्रकरणाच्या अनुषंगाने तहसीलदार छाया पवार यांनी नायब तहसीलदार देविदास खटावकर यांची गुन्हा दाखल करण्यासाठी नेमणूक केली. यामुळे त्यांनी जालना तालुका व मौजपुरी पोलिस ठाण्यात वरील दोघांविरुद्ध गुन्हे दाखल केले. तालुका ठाण्यातील गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक सुरेश उनवणे करीत असून मौजपुरी ठाण्यातील दाखल गुन्ह्याचा तपास एपीआय मिथुन घुगे करीत आहेत. दस्तऐवजाची केली पडताळणी तहसीलदारांनी दस्तऐवजावर टाकण्यात आलेले जावक क्रमांक, नकाशा याबाबत प्रत पाहून आढावा घेतला. शेतजमिनीचा अकृषक परवाना कसा झाला, याची नगररचना विभागाकडून माहिती घेतली. यात या शेतजमिनीचे बनावट अकृषक (एनए) दस्तऐवज असल्याचे समोर आले. ४० महिने प्रत्येकी ३ हजार ज्यांच्याकडे एकरकमी पैसे नाहीत, असे अनेक नागरिक दर महिन्याला ३ हजार रुपये भरत होते. ही रक्कम ४० महिने भरली. अनेकांनी सर्व रक्कम भरली. परंतु, अजूनही प्लॉट नावावर झाले नाहीत. यात अनेक जण हे हातावर काम करणारे आहेत. याप्रकरणी शेख मुस्ताक शेख अमीर, शेख असिफ शेख अमीर दोन्ही रा. कुच्चरवट्टा यांच्याविरूध्द भादंवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७२ भादंवि प्रमाणे २ वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

## पत्रकारांनी बातम्यांची मांडणी सकारात्मक करावी

### संतोष मुळी : माजलगावात दर्पण दिन साजरा



माजलगाव। प्रतिनिधी

स्पर्धेच्या युगामध्ये झटपट बातम्या दिल्याच पाहिजेत परंतु पत्रकारांनी बातम्यांची मांडणी सकारात्मक करण्याबरोबरच माजलगावातील पत्रकार सामाजिक दायित्व निभावत असल्याचे जेष्ठ पत्रकार संतोष मुळी यांनी सांगीतले.

येथील शासकीय विश्रामगृहावर दर्पण दिनानिमीत्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी जेष्ठ पत्रकार संतोष मुळी हे तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे, अच्युत लाटे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, हरिष यादव, उमेश जेथलिया, वैजनाथ घायतिडक, पुरूषोत्तम करवा यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना श्री. मुळी म्हणाले की, माजलगाव तालुका हा सधन व समृध्द आहे. या मतदारसंघामध्ये असणारे प्रश्न प्राधान्याने मांडुन पुर्णत्वाकडे नेण्यासाठी येथील पत्रकार कायम प्रयत्नशील असतात तर प्रसंगी विरोधकांची भुमिका देखील पत्रकारच बजावतात. प्रास्ताविकात पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर म्हणाले की, पत्रकार संघाच्या वतीने दर्पण पुरस्कारासह विवीध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-यांना पुरस्कार देउन गौरविण्यात येते परंतु यावर्षी जिल्ह्यामध्ये सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली या प्रकारामुळे सर्वत्र आक्रोश आहे. माजलगाव तालुका पत्रकार संघाने यावर्षी अत्यंत साध्या पध्दतीने हा दर्पण दिन साजरा केला आहे. येथील पत्रकार संघ व विवीध सामाजिक संघटनांच्या पुढाकारातुन सातत्याने सामाजिक बांधीलकी जोपासण्याचे काम होत आहे असे सांगीतले. सुत्रसंचालन कमलेश जाब्रस यांनी केले तर आभार सुभाष नाकलगावकर यांनी मानले. यावेळी सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते.

## खटोड प्रतिष्ठानच्या वतीने स्वामी समर्थ चरित्र कथेचे आयोजन

बीड /प्रतिनिधी

रेल्वे स्वप्नपूर्ती सोहळ्यानिमित्त स्व. झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान बीड आयोजित श्री स्वामी समर्थ जीवन चरित्र कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे. गेल्या कित्येक वर्षापासून बीड शहरवासीयांची मागणी होती परळी अहिल्यानगर मार्ग व्हावा याकरिता अनेक लोकप्रतिनिधींनी सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्य सेनानी व्यापाऱ्यांनी व सर्वच नागरिकांनी केंद्र शासनाकडून मागणी केली होती हे ६०-७० वर्षाचे स्वप्न आता पूर्ण होत आहे यानिमित्ताने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान बीडच्या वतीने दिनांक ८ ९ १० जानेवारी २०२५ तीन दिवसीय श्री स्वामी समर्थ जीवन चरित्र संगीतमय कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे

स्वामीजींचे शिष्य संपूर्ण भारतभर आहे या स्वप्न पूर्ती सोहळ्यानिमित्त स्वामीजींचे विचार मानव जीवनासाठी खूप कल्याणकारी आहे हे डोळ्यासमोर उद्दिष्ट ठेवून बीड जिल्ह्याचे सुपुत्र विचारवंत हरिभक्त परायण प्रकाश महाराज साठे हे स्वामी समर्थ महाराज जीवन चरित्र कथेचे निरूपण करणार आहे तरी या बीड शहरातील सर्व स्वामी भक्तांना विनंती आहे की आपण कथा श्रवणासाठी उपस्थिती लावावी बीड जिल्ह्यातील नागरिकांनी अनेक वर्षापासून केंद्र व राज्य शासनाकडे हा रेल्वे मार्ग लवकरात लवकर व्हावं याकरिता लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून स्वातंत्र्य सेनानी यांच्या माध्यमातून प्रयत्न केल परळी अहिल्यानगर हा मार्ग तयार होत असताना सध्या जानेवारी महिन्यापर्यंत बीड नगर मार्ग शंभर टक्के पूर्ण होत आहे खटोड प्रतिष्ठान गेल्या कित्येक वर्षापासून किर्तन महोत्सवाचे आयोजन करत आहे अनेक वेळा दूरच्या विचारवंतांना आमंत्रित करीत असताना तुमच्या बीड शहरांमध्ये रेल्वे नाही विमानतळ नाही असे कारण सांगून कीर्तन महोत्सव मध्ये त्यांचे विचार ऐकण्यापासून बिडकर खूप वेळेस वंचित राहायचे परंतु सर्वांच्या प्रयत्नातून रेल्वे मार्ग बीड अहिल्यानगर लवकरच सुरू होत आहे नक्कीच याचा फायदा आता सर्वांगीण होणार आहे या आनंदाने श्री स्वामी समर्थांचे आभार मानावेत याकरिता त्यांच्या जीवनचरित्राचे संगीतमय कथेचे निरूपण हरिभक्त परायण प्रकाश महाराज साठे हे करणार आहे कथा ही ब्राह्मणवाडी जवळ कुबेर नगर वृंदावन गार्डन च्या पुढे खटोड प्लाझा या ठिकाणी आठ जानेवारी ते १० जानेवारी रोज सकाळी बारा ते सायंकाळी आठ वाजेपर्यंत आयोजन करण्यात आलेले आहे तरी सर्व बीड करांना स्वामी भक्तांना विनंती आहे . कथा श्रवणासाठी आपण अवश्य याव व आपल्या मित्र सहकुटुंब कथा श्रवण करावी असे आवाहन गौतम घोटाळे यांनी केले आहे.

## रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष माणिकराव वाघमारे यांचा राजीनामा

बीड । प्रतिनिधी

परभणी येथे भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला, तसेच संसदेत देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत अपमान कारक विधान केलं होतं. या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ काल दि.०६.०१.२०२५ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर 'संविधान बचाव जनआक्रोश मोर्चा' काढण्यात आला या मोर्चामध्ये राष्ट्रीय नेते डॉ.राजेंद्र गवई यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी सहभागी झाले होते महाराष्ट्र राज्यामध्ये व देशांमध्ये रिपब्लिकन चळवळीची झालेली पीछेहाट पाहुन मन व्यतीत झाल्याचे सांगत समाजाला जर योग्य दिशा देऊन समाजाचे प्रश्न सोडवायचे असतील तर रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य होणे गरजेचे आहे असे मत व्यक्त करून यावेळी रिपब्लिकन ऐक्यासाठी रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष माणिकराव वाघमारे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत सर्व आंबेडकरी जनतेने आपल्या न्याय हक्कासाठी आणि समाजावर अन्याय होवू नये यासाठी एकत्र यावे असे आवाहन पत्रकाद्वारे केले आहे.

## कागदपत्राची पुर्तत करण्यासाठी निराधार लाभार्थ्यांना नोटीसा

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील संगायो इंगायो निराधार योजनेतील एकुणा १९३३० लाभार्थ्यांना आर्थिक मदत दिली जात आहे. त्यापैकी डी.बी.टी पोर्टलवर १४३३२ अपलोड करण्यात आलेले असुन ४४५५ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात आलेले आहे. श्रावणबाळ योजनेचे ६८५६ व सांगायो योजनेचे ३०५८ लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र, संपूर्ण नाव असलेले अपडेट ई आधार कार्डची झेरॉक्स प्रत, बैंकेत केवायसी करणे बाकी असल्याने लाभार्थ्यांना डी.बी.टी / पी.एफ.एम.एस पोर्टलद्वारे लाभ देण्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करावे करिता संजय गांधी निराधार लाभार्थ्यांना अंबड तहसील कार्यालयामार्फत नोटिसा काढण्यात आल्या आहेत अशी माहिती अंबड तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी दिली आहे. संबंधित तलाठ्यांमार्फत या नोटीस गावोगावी बजावण्याचे काम सुरू झाले आहे.

तालुक्यातील संगायो, इंगायो, श्रावणबाळ या विविध योजना अंतर्गत निराधार लाभार्थ्यांना शासनाकडून आर्थिक मदत केल्या जाते सदरील मासिक लाभ डीबीटी पोर्टलद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. या लाभार्थ्यांची माहिती या पोर्टलवर अद्यावत करण्याचे बंधनकारक कारण्यात आलेले आहे. त्यासाठी 'संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना तहसील कार्यालयातून एक नोटीस काढण्यात आली असून त्यामध्ये लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र, संपूर्ण नाव असलेले अपडेट ई आधार कार्डची झेरॉक्स प्रत, बँकेत केवायसी करून घेणे आवश्यक आहे. तसेच लाभार्थ्यांनी मोबाइल क्रमांक द्यावा. कागदपत्रे दाखल करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. ती आता १० जानेवारी २०२५ पर्यंत मुदत वाढवण्यात आलेली आहे. संबंधित निराधार लाभार्थ्यांनी वेळेत कागदपत्रे तलाठी किंवा अंबड येथील तहसील कार्यालयातील निराधार विभागात दाखल करावेत असे आवाहन तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे.

## संत श्री भगवान बाबा इन्स्टिट्यूट सेंटरचे आ. लोणीकर यांच्या हस्ते उद्घाटन

जालना। प्रतिनिधी

शिक्षकांना आज विद्यार्थी घडविण्याबरोबरच इतर कामेही करावी लागत आहेत. शिक्षकांची परिस्थिती वाईट झाली आहे. अशा परिस्थितीमध्येही शिक्षक अतिशय चांगले काम करतात व त्यांचे योगदान मोठे आहे. शिक्षण हे केवळ हुशार होण्याकरिता नसून शहाणे होण्याकरिता असावे, मुलांचा कल व आवड याचा विचार होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये असलेली ध्येयासक्ती व तुमची आवड तुम्हाला यशोशिखरावर घेऊन जाते, कठोर परिश्रमला पर्याय नाही. तसेच पालकांनी मुलांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्र निवडून त्यामध्ये करियर करण्याची संधी द्यावी. संत श्री भगवान बाबा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी एज्युकेशन रिसर्च फाउंडेशन सेंटरच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थी घडावेत अशी अपेक्षा यावेळी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली

जालना तालुक्यातील ढगे येथे संत श्री भगवान बाबा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी एज्युकेशन रिसर्च फाउंडेशन सेंटरचे उद्घाटन माजी मंत्री आमदार श्री



बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी आमदार तोतारामजी कायंदे माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर भाऊसाहेब घुगे, शिवाजीराव कदम ,संस्थेचे अध्यक्ष ह भ प डॉ. सुदाम महाराज चपटे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, जग अतिशय वेगाने बदलत आहे. सध्या एका बटनावर सगळी माहिती उपलब्ध होत आहे. शिक्षणातून कौशल्य मिळाले नाही तर शिक्षण व्यर्थ ठरते. सर्वप्रथम देशाचे उत्तम नागरीक व्हावा. अपयशावर मात करुन पुढे जाण्याची तयारी ठेवा. विपरीत परिस्थितीमध्ये निराश न होता त्याला तोंड कसे देता येईल याचा अभ्यास करा, तसेच शिक्षक आणि पालकांनी मुलांना पाठबळ द्यावे व त्यांच्यावर विश्वास ठेवावा तरच विद्यार्थी यांना जागतिक स्पर्धेत टिकता येईल.मुलांना शिकवण , मोठं करणे हे पालकांचे आद्य कर्तव्य असते.पण मुलांना लहानपणापासून चांगले संस्कार करणे हे सुद्धा महत्वाचे कार्य आहे.लहान असतानाच त्यांच्यातील सुप्त गुण ओळखून त्यांना उचित मार्गदर्शन केल्यास मुलांची सर्वांगीण प्रगती होते.लहान असतानाच कठोर शिस्त लावणे , वेळच्यावेळी अभ्यास करणे , आदर करणे , स्वच्छता , नियोजनबद्धता या गोष्टींची वेळीच दक्षता घेतली असता मुले सर्व बाबतीत तयार होतात. या इन्स्टिट्यूट मध्ये देखील त्यांचे वागणे ,बोलणे कसे आहे , इतर कोणत्या गोष्टी ती करत असतात याकडे नेहमी शिक्षकांबरोबरच पालकांचे लक्ष असणे गरजे आहे.जेंव्हा सर्वच बाबतीत मुले अग्रेसर असतात तेंव्हा अशी मुले आईवडिलांची व शाळेची मान उंचावण्यासाठी प्रयत्न करत असतात असेही यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

# अविनाश पाठक यांनी दिली वीस बिअरबारला मंजूरी

## जिल्ह्यात ८४० बिअर बार, दारूडे अजून किती वाढवायचे ? -ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात एकीकडे गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत असताना दुसरीकडे दारूची दुकाने वाढवून समाजाची वाट लावली जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन वीस बिअरबारला मंजुरी दिल्याने आता जिल्यातील दारू दुकानांची संख्या आठशे चाळीस वर गेली आहे. आता तरी दारुड्यांची संख्या वाढवू नका. नवीन दारू दुकाने देऊ नका, अशी मागणी जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे.**

बीड जिल्ह्यात बिअरबार, देशी दारू, वाईन शॉप, होलसेल अशी एकूण आठशे एकोन चाळीस एवढी दारू दुकानांची संख्या आहे. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे या असताना त्यांच्या काळात मोठ्या प्रमाणात दारू दुकाने दुकानांना परवाना देण्यात आले. दि. १ जानेवारी २०२३ पासून दि. १५ जून २०२४ या साधारणतः दीड वर्षाच्या काळामध्ये शहात्तर नवीन लायसन देण्यात आले. या दिड वर्षात देण्यात आलेल्या शहात्तर लायसन पैकी फक्त वीस लायसन अविनाश पाठक यांनी दिली. बाकीची लायसन तत्पूर्वीच्या जिल्हाधिकारी मुंडे यांनी दिले आहेत. एकीकडे गुन्हेगारी पर्व वाढत आहे. तर दुसरीकडे मद्य विक्री

- ✻ जिल्ह्यात आठशे चाळीस दारू दुकाने
- ✻ दिपा मुंडे यांनी छपन्न बियरबार दिले
- ✻ अविनाश पाठक यांनी वीस बार तडकाफडकी दिले
- ✻ गुंडगिरी, दारुड्यांना प्रशासनाचे प्रोत्साहन
- ✻ समाजहित पहा, नैतिकता बाळगा
- ✻ प्रशासनापेक्षा बाहेरच्या लोकांनी मलिदा मारल्याची चर्चा

परवाण्याची संख्या वाढवून जनजीवन विस्कळीत केले जात आहे. जिल्हाधिकारी पदावर अविनाश पाठक हे रुजू झाल्यानंतर त्यांनी आम्हाला शब्द दिला होता की, जिल्ह्यात एकही बिअर बार मंजूर करणार नाही. पण हा शब्द फेल ठरला. आणि त्यांनी वीस बिअरबार मंजूर केले. एक बिअरबारला पाच लाखापेक्षा जास्त खर्च येत असल्याचे काहींनी आम्हाला सांगितले. त्यामुळे बियरबारला मंजुरी देताना कोट्यावधींचा घोटाळा झाल्याची आणि भ्रष्ट कारभार झाल्याचे समोर येत आहे. प्रशासनापेक्षा बाहेरच्या लोकांनी मलिदा मारल्याची चर्चा आहे. जिल्ह्यातील लोकांनी लाजा सोडल्याने समाजाचे वाटोळ होत आहे. दारू दुकान मंजूर करणे, हा नियम असला, तरी सामाजिक हित, आणि नैतिकता पाहिली पाहिजे. कामधंदा नाही, बेकारी वाढली आहे. गुन्हेगारी वाढली आहे. अशात दारुडे वाढविणे म्हणजे समाज व्यवस्था विस्कळीत करणे आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आता तरी नवीन लायसन देऊ नयेत, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.तर दारू दुकाने वाढवण्याच्या मुद्द्याला आता आपण हात घालणार असून उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांच्यासह या खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे समाज बिघडू नका, सामाजिक स्वास्थ्य जागेवर राहू द्या, दारुड्यांच्या कुटुंबाचे वाटोळ करण्यात सहभाग नोंदवू नका, राज्याचा महसूल खूप मोठा आहे. त्यातील भ्रष्टाचार कमी करा. त्याच बरोबर राज्य उत्पादन शुल्क खात्याच्या माध्यमातून नवीन दारू दुकाने देऊन महसूल गोळा करण्याच्या भानगडीत पडून पाप करू नका, अशीही मागणी करणार असल्याचे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

## रस्ता सुरक्षा अभियानात नियमावलीचे पालन करा -जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा म्हणजे प्रत्येक नागरिकाच्या जीवाचे संरक्षण, रस्ता सरळ आणि वाहने चालविणे बेताचे असेल तर आपण आपल्या जीविताचे संरक्षण करु शकतो. यासाठी रस्यासंतील दुभाजक, स्पीडब्रेकर, वळण रस्ता, चौक अशा ठिकाणी वाहन चालवण्याचे नियम वापरणे गरजेचे आहे. प्रत्येक ठिकाणी कायदा आपले संरक्षण करु शकत नाही तर आपणच घालून दिलेल्या नियमावलीचे पालन करावे, असे प्रतिपादन रस्ता सुरक्षा अभियानाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केली होती त्यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले.



या बैठकीस खासदार बजरंग सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती तसेच बालाजी धनवे, व्हि. डी. सपकाळे, गणेश जायभाये, शेखर अचार्य विविध विभागाचे संबधित अधिकारी उपस्थित होते. मृत्युदर व अपघाताचे प्रमाण कसे कमी करता येईल यावर पुढील मुद्यांवर आढावा घेतला. रस्ते सुरक्षाबाबत काय उपायोजना केल्या,रत्याची प्रलंबित कामांचे प्रस्ताव नव्याने सादर करावेत, जिल्हा नियोजन समितीमधून निधी मंजूर करता आला तर तशी मागणी करता येईल. जिल्हयातील ब्लॅक स्पॉटची स्पाटची तपासणी, जिल्हास्तरावर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रस्ता सुरक्षा उपाययोजना, जिल्हयातील अपघातांची संख्या कमी करणे, जिल्हयामध्मये होणा-या अपघाताची नोंद, दुभाजके तोडून शासकीय मालमत्तेचे नुकसान करणा-या व्यवसायिक आस्थापनावर कारवाई, ट्रामा केअर सेंटर आणि रस्त्या लगत असणारे प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हयामध्ये होणारी अपघाताची नोंद इरादा या ॲपबेस व वेबबेस प्रणालीवर नोंदविणे, दोषी वाहन धारकावर कारवाई करणे इत्यादी मुद्याचा आढावा या प्रसंगी श्री पाठक यांनी घेतला. प्रस्ताविक व आभार प्रदर्शन कार्यकारी अभियंता व सदस्य सचिव आर.पी तोडें यांनी केले.

## केंद्र सरकारने पत्रकार संरक्षण कायदा करून तो देशभर लागू करावा -एस.एम.देशमुख यांची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

छत्तीसगढ येथील तरूण पत्रकार मुकेश चक्राकर यांची झालेली निर्घृण हत्त्या आणि देशातील पत्रकारांवरील वाढते हल्ले लक्षात घेऊन केंद्र सरकारने देशभर पत्रकार संरक्षण कायदा लागू करावा अशी मागणी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली आहे..



भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवत बातमी दिल्याबद्दल बिजापूर येथील रस्ता गुंतेदाराने तरूण पत्रकार मुकेश चक्राकर यांची निर्घृण हत्त्या केली.. त्या अगोदर महाराष्ट्रात देखील रत्नागिरी येथील पत्रकार शशिकांत वारिशे यांना गाडीखाली चिरडून ठार करण्यात आले.. नरेंद्र मोदी सरकारच्या काळात देशात तब्बल २८ पत्रकारांच्या हत्या झाल्या आहेत.. यामध्ये केवळ युपी, बिहारच नाही तर मध्यप्रदेश, झारखंड, पंजाब, गुजरात, पंजाब, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, जम्मू आणि काश्मीर या राज्यांमध्ये देखील पत्रकारांच्या हत्त्या झालेल्या आहेत..

पत्रकारांवरील जीवघेणे हल्ले देखील वाढल्याने माध्यम जगतात मोठा असंतोष आणि असुरक्षिततेची भावना आहे.. माध्यमं लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ ◀◀ पान ३ वर

## आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीसाठी सदस्य नोंदणी महत्त्वाची -आ. लोणीकर

**परतुर । प्रतिनिधी**

राज्यभरात भाजपचे सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत असून लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह गावातील भूत पातळीवर काम करणाऱ्या व्यक्तीसह भारतीय जनता पक्षाचे मतदार यांची सदस्य नोंदणी करून या सर्वांनाच या अभियानाच्या माध्यमातून भाजपचे सदस्य केले जात आहे.



पक्षाकडून डिसेंबरपासून सुरू झालेल्या सदस्य नोंदणी अभियानात प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी सदस्य नोंदणीचे लक्ष्य देण्यात आले असून परतुर विधानसभा मतदारसंघासाठी ७० हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांनंतर लागलीच संघटन पर्वाची सुरुवात झाली असून आगामी काळात कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत त्यासाठी पक्षाचे सदस्य नोंदणी महत्त्वाचे असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे.

जालना तालुक्यातील नेर व सेवली या ठिकाणी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी शक्ती केंद्रप्रमुख भूतप्रमुख व प्रमुख कार्यकर्ते यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकी प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या ऐतिहासिक विजयानंतर पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी हे अभियान राबविले जात असून राज्य, विभाग, जिल्हा, मंडळ अशा सर्व ठिकाणी प्राथमिक सदस्यता नोंदणी प्रक्रियेला सुरु आहे. राष्ट्राला समर्पित भावनेतून काम

## अंबाजोगाईत सौहार्दपूर्ण वातावरणात इज्तेमा ; लाखो मुस्लिम बांधवांचा सहभाग

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरात मुस्लीम समाजाचा दोन दिवसीय जिल्हास्तरीय इज्तेमा अत्यंत सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडला. सदर बाजार नजीक चांदमारी परिसरात जवळपास दीडशे एकर भागावर इज्तेमासाठी अत्यंत नियोजनबद्ध तयारी करण्यात आली होती. इज्तेमासाठी जिल्हाभरातील सर्व तालुक्यातून जवळपास दोन लाख मुस्लीम बांधवांनी प्रार्थनेसाठी एकत्र येत सर्वांचा हिताची आणि



कल्याणाची दुवा मागितली.

मागील एक महिन्यापासून अंबाजोगाईतील इज्तेमाची जोरदार तयारी सुरु होती. चांदमारी परिसरातील दीडशे एकर जागेवर इज्तेमा आयोजित करण्यात आला. मुस्लीम धर्मियांमध्ये इज्तेमाचे अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुवारी पहाटेपासूनच जिल्हाभरातून लाखो मुस्लीम बांधव इज्तेमास्थळी एकत्र येऊ लागले होते. दोन दिवसीय बीड जिल्हा इज्तेमाची सुरुवात गुरुवारी (दि.२) पहाटेच्या नमाज (फजर) नंतर सुरू झाली. शुक्रवारी मगरीबच्या नमाज नंतर दुवा होऊन इज्तेमाची सांगता झाली. यावेळी उपस्थितांनी प्रार्थनेसाठी एकत्र येत सर्वांच्या ◀◀ पान ३ वर

## शिक्षण विस्तार अधिकारी क्रांती खेडकर सावित्रीची लेक या पुरस्काराने सन्मानित

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रा राज्य प्राथमिक शिक्षण समिती यवतमाळ यांच्यावतीने प्रशासकीय कार्यामध्ये अल्पावधीतच उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्हास्तरीय उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी म्हणून सावित्रीची लेक या पुरस्काराने ३ जानेवारी रोजी यवतमाळ येथे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मंदार पत्की ,व आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते वडवणी ची लेक क्रांती महादेव खेडकर यांना सावित्रीची लेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विजयजी कोंबे राज्य अध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ,प्रमुख पाहुणे प्रकाश जी मिश्रा शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ, श्रीमंती



निधाताई गावंडे उपशिक्षणाधिकारी यवतमाळ, श्रीमंती सपना ताई पावडे प्रसिद्ध कवयित्री ,सारिका फुसे पोलीस उपनिरीक्षक , डॉ.स्नेहा भुयार यांच्या प्रमुख उपस्थिती होती.शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट काम करुन आपण जीवन समर्पित करणाऱ्या वडवणी ची लेक क्रांती महादेव खेडकर यांनी यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून चांगले कार्य केले म्हणून सावित्रीची लेक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## पत्रकार सय्यद शाकेर यांना मानाचा दर्पण पुरस्कार जाहीर

किल्लेधारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने दर्पण दिनानिमित्त जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील म्हणजे ११ पत्रकारांना तसेच एका वृत्तपत्र विक्रेत्यांना यावर्षीचा दर्पण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. धारूर येथील अभ्यासु व सामाजीक कार्यात सतत अग्रेसर असणारे पत्रकार सय्यद शाकेर याना दर्पण पुरस्कार जाहीर करण्यात आला असून त्यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वत्र कौतूक होत आहे.



महाराष्ट्र राज्यपत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने दर्पण दिनानिमित्त जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील म्हणजे ११ पत्रकारांना तसेच एका वृत्तपत्र विक्रेत्यांना यावर्षीचा दर्पण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहेया पुरस्काराची घोषणा पत्रकार संघाचे ◀◀ पान ३ वर

## आष्टी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्याकडुन हातभट्टी दारूचा बिमोड करण्याचा निर्धार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी व आष्टी परीसरात ब-याच गावात हातभट्टी दारुचे अड्डे होते ही दारु पिऊन अनेकांना आपले प्राण गमावे लागले तर अनेकांना व्यंगत्व आले आहे. या विषयी अनेक तक्रारी झाल्या मात्र काही दीवस बंद करायचे नंतर पुन्हा व्हायच्या त्या हातभट्टीची आंडे मात्र या गोष्टीचे गांभिर्य लक्षात घेत आमदार सुरेश धस यांनी निवडुन आल्या नंतर आपल्या पहील्या बैठकीत सक्त ताकीद देत सांगितले मला यापुढे तालुक्यात एकाही हातभट्टी दारु विक्रेता दीसता



कामा नये.यावर आंमल करत तालुका पोलिस निरीक्षक शरद भुतेकर यांनी कारवाईचा धडाखा लावत तालुक्यातील सर्व हातभट्टी आंडे उध्वस्त केली आहेत. तर शहर विनालायस गाडी चालविणारे कर्ण कर्कश सायलेन्सर गाडीला लावणारे वेगवेगळ्या नावाच्या गाडीवर नेमफलेट लावणारे या सर्वांनवर देखील दंडात्मक कारवाई केली आहे तर या पुढील काळात शहरात मुख्य चौकात वाहतुकीस आडथळा निर्माण करणारांवर देखील दंडात्मक कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## डॉ.इंगोले यांची इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक अध्यक्षपदी सलग तिसऱ्यांदा फेरनिवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडीयन मेडीकल असोसिएशन अंबाजोगाईचे सलग आठ वर्षे अध्यक्षपद भूषविलेले विक्रमादित्य डॉ.राजेश इंगोले यांनी मागील दोन वर्षी आय.एम.ए. संघटनेतील सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष म्हणून केलेल्या भरीव व दमदार कार्याची नोंद घेत त्यांची पुन्हा एकदा राज्यकार्यकरणीच्या सांस्कृतिक समितीच्या अध्यक्षपदी सलग तीसऱ्या वर्षी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.इंगोले यांच्या या विक्रमी निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत व अभिनंदन होत आहे.

आय.एम.एचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.संतोष कदम, सचिव डॉ.अनिल आव्हाड, डॉ.जयेश लेले, नूतन अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे, डॉ.दिनेश ठाकरे, डॉ.रामकृष्ण लोंढे, डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ.राजीव जेथलिया, डॉ.राजीव अग्रवाल, डॉ.सौरभ संजनवाला, डॉ.अनिल पाचनेकर, डॉ.नवरंगे, डॉ.राजू वरयानी, डॉ.संजय पाटील, डॉ.रंजन संचेती, डॉ.वसंत लुंगे, डॉ. सारंग कुलकर्णी यांच्यासह राज्य कार्यकारणीच्या सर्व सदस्यांनी एकमताने डॉ.राजेश इंगोले यांची सांस्कृतिक समितीच्या चेअरमनपदी निवड केली आहे. मागील दहा वर्षांपासून डॉ.राजेश इंगोले यांनी ज्या धडाडीने आणि तडफेने संघटनेचे काम केले आणि गेल्या तीन



वर्षांपासून सांस्कृतिक समिती मार्फत डॉक्टर्ससाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन केले आणि वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी सांस्कृतीक चळवळ गतिमान केली,त्याची दखल घेऊन राज्य कार्यकारणीच्या सर्व सदस्यांनी डॉ.राजेश इंगोले यांची राज्य सांस्कृतीक समितीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड केली आहे. इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समितीच्या वतीने डॉ.इंगोले यांनी पुण्यामध्ये प्रथमच महाराष्ट्रातील साहित्यिक डॉक्टर्सचे पहिले शब्दगंध साहित्य संमेलन आयोजित करून तसेच कलादर्पण सांस्कृतिक महोत्सव सलग दोन वर्ष आयोजित करून डॉक्टर्सच्या साहित्यिक कलेला व्यासपीठ मिळवून दिले. या उपक्रमाची राष्ट्रीय कार्यकारणीने दखल घेत डॉ.राजेश इंगोले यांचा सन्मान केला होता. डॉ.इंगोले यांनी अंबाजोगाईच्या शाखेचे अध्यक्ष म्हणून काम करीत असताना संघटनेला तीन वेळा सर्वोत्कृष्ट शाखा, तीन वेळेस सर्वोत्कृष्ट अध्यक्ष असे विविध पुरस्कार मिळवून दिले. नुकताच त्यांना आय.एम.एचा राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट सांस्कृतीक समिती अध्यक्ष या ◀◀ पान ३ वर

## निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे मराठी भाषेतील पहिले वृत्त साप्ताहिक दर्पण हे सर्वप्रथम काढले व या दर्पण साप्ताहिकाच्या माध्यमातून समाजातील तत्कालीन समस्या आणि अडचणी विषयाचे काम कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी केल तसेच तत्कालीन इंग्रज सरकार विरुद्ध आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजात जागृती निर्माण करण्याचे काम केले व दर्पण म्हणजे आरसा समाजातील घटनांचा घडामोडीचा आरसा समाजासमोर मांडण्याचे काम केले तो दिवस म्हणजे सहा जानेवारी म्हणून दरवर्षी दर्पण दिन साजरा केला जातो




### पत्रकारांना बदनाम करण्याचे काम काही प्रवृत्ती करतात-ज्येष्ठ पत्रकार उमेशकाका मोगरेकर

त्याचीच औचित्य साधून माजलगाव च्या निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून जेष्ठ पत्रकार व नुकताच बीड जिल्हा दर्पण पुरस्कार प्राप्त झालेले सर्वांचे मार्गदर्शक उमेश मोगरेकर यांचा सर्व पत्रकारांच्या वतीने सत्कार करण्यात आला,प्रसंगी सत्काराला उत्तर देताना ज्येष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर म्हणाले की, समाजातील काही प्रवृत्ती ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# ज्येष्ठ महिलेची फसवणूक; केअरटेकर महिलेला बेड्या, साडेआठ लाखांचे दागिने जप्त

**पुणे | प्रतिनिधी**

जेष्ठ महिलेचा सांभाळ करण्यासाठी ठेवलेल्या एका केअरटेकर महिलेनेच दागिने चोरून पोबारा केल्यानंतर या महिलेला बिबवेवाडी पोलिसांनी सापळा रचून अटक केली. तिच्याकडून ८ लाख ७० हजार रुपयांची सोन्याची लगड जप्त करण्यात आली. गायत्री सुनील हातेकर (वय २४, रा. चव्हाणनगर, धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत एका महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.



नोव्हेंबर महिन्यात ही घटना घडली होती. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बिबवेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शंकर साळुंखे, गुन्हे शाखेचे निरीक्षक मनोजकुमार लोंढे, सहायक निरीक्षक संजय निकुंभ, उपनिरीक्षक शशांक जाधव, आशिष गायकवाड, राहुल शेलार, नितीन कातुर्डे, गोकुळा काटकर यांनी ही कामगिरी केली.

तक्रारदार महिलेची आई बिबवेवाडी भागात राहायला आहेत. त्यांच्या बंगल्यातून २५ तोळे दागिने चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला होता.

नोव्हेंबर महिन्यात ही घटना घडली होती. पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येत होता. तक्रारदार महिलेच्या घरी आईसाठी केअरटेकर म्हणून या महिलेला ठेवले होते. दरम्यान तिने कोणाचे लक्ष नसल्याची संधी साधून कपाटातून दागिने चोरले होते. तपास करत असताना उपनिरीक्षक शशांक जाधव यांना याबाबतची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत तिने दागिने चोरल्याची कबुली दिली. चोरलेल्या दागिन्यांपैकी साडेआठ लाख रुपयांची सोन्याची लगड जप्त करण्यात आली आहे.

ज्येष्ठ महिलेचे पावणेचार लाखांचे मंगळसूत्र चोरले

विवाह समारंभासाठी निघालेल्या ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील पावणेचार लाख रुपयांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना एरंडवणे भागातील डीपी रस्त्यावर घडली. याप्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात दुचाकीस्वार चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने तक्रार दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नांदेड सिटीत राहायला आहेत. रविवारी (५ डिसेंबर) त्यांच्या नात्यातील एकाचा डीपी रस्त्यावरील मंगल कार्यालयात विवाह होता. महिला आणि त्यांचे पती रात्री सव्वा आठच्या सुमारास डीपी रस्त्याने निघाले होते. त्यावेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील पावणेचार लाख रुपयांचे मंगळसूत्र चोरले. महिलेने आरडाओरडा केला. दुचाकीवरील चोरटे भरधाव वेगात पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक गोरक्ष घोडके तपास करत आहेत.

पुणे हादरलं! तरुणावर कोयत्याने हल्ला

पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. वर्षांपूर्वी झालेल्या किरकोळ वादातून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलाने आणि त्याच्या साथीदाराने एका चोवीस वर्षीय तरुणावर कोयत्याने हल्ला केला. त्याचा हात मनगटापासून तोडला असून, त्याच्या डोक्यावर व हात आणि पायावर वार करण्यात आले आहेत. तर त्याच्या एका मित्राला देखील मारले आहे. एकमेकांकडे रागात बघण्याच्या कारणावरून हा वाद झाला होता. ही घटना बिबवेवाडी परिसरात घडली. पियुष पाचकूडवे (वय २४) हा हल्ल्यात गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तरुणावर ससून रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली असून, आणखी एक शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

# दूध अन् कांदा दरवाढीसाठी सुप्रिया सुळे आक्रमक; सरकारला दिला इशारा

बारामती : सध्या कांद्याचे दर कोसळले आहेत, दुधाला दिले जाणारे अनुदान वेळेवर येत नाही, त्यामध्ये खर्च देखील निघत नाही, त्यामुळे कांदा व दुधाला दरवाढ मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नसून, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी, याबाबत आपण केंद्राच्या अर्थसंकल्पात मागणी करणार असल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

बारामती शहरातील तीन हत्ती चौक या ठिकाणी कांदा व दुधाला दरवाढ मिळण्याच्या मागणीसाठी खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी दुधाचे पाऊच व कांदे नागरिकांना वाटून अनोखे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात खासदार सुळे बोलत होत्या. यावेळी युवा नेते युगेंद्र पवार, एस. एन जगताप, संदीप गुजर, सत्यव्रत काळे, वनिता बनकर, आरती शेंडगे आदींसह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी खासदार सुळे म्हणाल्या, विधानसभा निवडणूक संपल्यानंतर सरकार स्थापन होऊन मंत्रिमंडळ बनवण्यामध्ये एक महिना निघून गेला. मात्र मायबाप जनतेकडे बघण्यास या सरकारला वेळ नव्हता. सरकार स्थापन होऊन दीड ते दोन महिने झाले तरी शेतकऱ्यांबाबत ठोस निर्णय झालेला नाही. आम्हाला फक्त विरोधाला विरोध करायचा नाही, राज्यात प्रचंड महागाई वाढली आहे. शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. सरकारने शेतकऱ्यांना दुधासाठी जे अनुदान दिले होते, ते वेळेवर येत नाही, त्या अनुदाना मध्ये खर्च निघत नाही. दुधाला अनुदान देण्याऐवजी चाळीस रुपये प्रति लिटर दर द्यावा, ही दूध उत्पादकांची मागणी आहे. याबाबत आम्ही सरकार बरोबर कधीही चर्चा करण्यासाठी तयार आहोत.

शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आमची सहकार्याची भावना आहे. शेतकऱ्यांकडून माहिती घेऊन सरकारने याबाबत निर्णय घ्यावा हीच आमची अपेक्षा आहे. मात्र सरकार दरबारी गेल्यानंतर आम्हाला कोणताही न्याय मिळाला नाही, त्यामुळे रस्त्यावर उतरण्याची वेळ आमच्यावर आली आहे. कृषिमंत्री दादा भुसे यांची मुंबईमध्ये भेट झाल्यानंतर मी कांद्यावरील निर्यात शुल्क २० टक्के वरून शून्य टक्के करावा,शेतकऱ्यांना हमीभाव द्यावा, अशी आग्रही मागणी आपण त्यांना केले आहे. महाराष्ट्र सह देशातील शेतकऱ्यांना शेती परवडत नाही. उद्योजकांना त्यांच्या थकीत कर्जासाठी त्यांचे कर्ज माफ अथवा त्यांना सूट देण्यासाठी हेअरकट दिला जातो, त्याप्रमाणे शेतकऱ्यांना देखील हेअर कट देऊन सरसकट कर्जमाफी करावी, याबाबत आपण अर्थसंकल्पात मागणी करणार असल्याचे खासदार सुळे यांनी सांगितले. सत्तेवर आल्यानंतर दुधासह कांदा, सोयाबीन व कापसाला हमीभाव देण्याचे आश्वासन या सरकारने दिले होते. तो शब्द त्यांनी पाळावा याची आठवण त्यांना आम्ही या आंदोलनाच्या माध्यमातून करून देत असल्याचे सांगून खासदार सुळे म्हणाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेऊन या मागण्या त्यांच्या पुढे आम्ही मांडणार आहोत. असंही सुळे म्हणाल्या.

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाच माजी नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

**पुणे | प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाच माजी नगरसेवकांनी आज (ता. ७) मुंबईमध्ये प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीमध्ये प्रवेश केला. या पाच माजी नगरसेवकांमुळे भाजप आणखी मजबूत झाल्याचा दावा भाजप नेते करत आहेत. मात्र, या नगरसेवकांच्या विरोधात ज्यांनी २०१७ मध्ये महापालिकेची निवडणूक लढवली होती, त्यात काहींचा निसटता पराभव झाला होता. अशा भाजपच्या कार्यकर्त्यांच्या उमेदवारी मात्र गंडांतर आल्याने भाजपमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर आता पुणे महापालिकेच्या निवडणुकीचे वेध राजकीय पक्षांना लागले आहेत. २०१७ मध्ये शिवसेनेचे १० नगरसेवक निवडून आले त्यातील विशाल धनवडे, बाळा ओसवाल, प्राची आल्हाट, पल्लवी जावळे, संगीता ठोसर या पाच माजी नगरसेवकांनी आज प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार सुनील कांबळे यावेळी उपस्थित होते. भाजपने महापालिकेसाठी या माजी नगरसेवकांचे स्वागत केले असले तरी त्यांच्या प्रभागात गेले अनेक वर्ष काम करणाऱ्या व भाजपमधून इच्छुक असणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत प्रामाणिकपणे काम केले, महापालिकेची तयारी सुरु असताना पक्षात अन्य पक्षातील माजी नगरसेवकांचा प्रवेश केला जात असल्याने भविष्यात उमेदवारी मिळविण्यासाठीची स्पर्धा तीव्र होणार आहे. त्यामुळे धाकधूक वाढली आहे. विशेष म्हणजे या पाच माजी नगरसेवकांपैकी चार जणांची थेट लढत भाजपच्या उमेदवारासोबत झाली होती. यातील बाळा ओसवाल हे १४८१ मतांनी विजयी झाले, संगीता ठोसर या केवळ १८१, प्राची अल्हाट या ७७५, विधान धनवडे फक्त २६६ मतांनी विजयी झाले. तर पल्लवी जावळे यांनी अपक्ष उमेदवाराचा २७६९ मतांनी पराभव केला. त्यांच्या विरोधात भाजपचा उमेदवार रिंगणात नव्हता. तेथेही आता भाजपमधून अनेक इच्छुक तयार झालेले असताना जावळे यांच्या प्रवेशाने कार्यकर्ते अस्वस्थ झाले आहेत.

# भाजप हा राष्ट्रीय विचारधारा जपणारा पक्ष-भेगडे

**मंचर | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी हा राष्ट्रीय विचारधारा जपणारा पक्ष आहे. सर्वांनी जास्तीत जास्त सभासदनोंदणी करावी. मंचर शहरात भाजपचे नेते संजय थोरात यांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहचविल्या जात आहेत, ही पक्षाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे, असे मत भारतीय जनता पार्टी किसान मोचार्चे प्रदेशाध्यक्ष गणेश तात्या भेगडे यांनी व्यक्त केले.



गणेश भेगडे यांनी भाजप नेते संजय थोरात यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली. प्रदेश भाजपच्या वतीने संघटनपर्व अंतर्गत सभासदनोंदणी अभियान सुरू आहे. या अंतर्गत मंचर शहरात सभासद नोंदणी सुरू करण्यात आली, त्या वेळी भेगडे बोलत होते. भेगडे म्हणाले की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकवायचा आहे. त्यानुषंगाने कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. लोकसभा, विधानसभेला आपण युतीधर्म पाळला. आता येणार्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी आपली ताकद आहे, त्या ठिकाणी शंभर टक्के आपण आपले उमेदवार उभे करणार आहोत. महायुतीचा निर्णय हा वरिष्ठपातळीवर घेतला जाईल. परंतु, मंचर नगरपंचायतीसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थेवर भाजपचा झेंडा फडकवायचा आहे, हे डोळ्यांसमोर ठेवून काम करा. संजय थोरात यांचे काम उत्तमरीत्या सुरू आहे. योग्य वेळी आपल्याला नक्कीच न्याय मिळेल. या वेळी सुरेश अभंग, नवनाथ थोरात, कालिदास गांजाळे, माऊली बाणखेले, अतिश काजळे, धनेश थोरात, अनिल अरगडे, महेश गांजाळे, स्नेहल चासकर, रूपाली घोलप, रूपाली दैने आदी उपस्थित होते.

# जीवघेण्या नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

संक्रांतीतील पतंगबाजीसाठी वापरल्या जाणार्या नायलॉन मांजामुळे नागरिक, तसेच पक्ष्यांना गंभीर दुखापत होण्याच्या घटना घडल्या आहेत. दरम्यान, नायलॉन मांजा विक्रीवर बंदी असताना छुप्या पद्धतीने मांजा विक्री करणार्या दोघांना गुन्हे शाखा आणि बिबवेवाडी पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडून नायलॉन मांजाची रिळे जप्त करण्यात आली. बिबवेवाडी आणि धानोरी भागात ही कारवाई करण्यात आली.



बिबवेवाडी भागातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठेनगर परिसरात एक जण नायलॉन मांजाची विक्री करत असल्याची माहिती पोलीस शिपाई सुमीत ताकपेरे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तेथे छापा टाकून नायलॉन मांजाची ५० रिळे जप्त केली. जप्त केलेल्या मांजाची किंमत दहा हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आदेशाचा भंग करणे, तसेच पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये पृथ्वीराज म्हस्के (वय २३) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमीत ताकपेरे यांनी याबाबत बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवालदार आंग्रे पुढील तपास करत आहेत. तसेच विश्रांतवाडी भागातील मुंजाबा वस्तीत नायलॉन मांजाची विक्री करणार्या एकाला गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाने पकडले. त्याच्याकडून नायलॉन मांजाचे रिळ जप्त करण्यात आली. याप्रकरणी नसीम शेख (वय ५०) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या युनिट चारचे पोलीस कर्मचारी नागेशसिंग कुंवर यांनी याबाबत विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवालदार केंद्रे तपास करत आहेत.

# पुण्यात एकाच कंपनीत काम करणाऱ्या सहकाऱ्यानं केला महिलेवर हल्ला, आरोपी पोलिसांच्या ताब्यात

पुण्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. एका महिलेवर कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना घडली आहे. हा हल्ला पुण्यातील येरवडा भागातील नामांकित आयटी कंपनीच्या पार्किंगमध्ये करण्यात आला आहे. संबंधीत महिलेवर तिच्याच सहकाऱ्याने कोयत्याने वार केल्याची माहिती मिळाली आहे. हल्ल्यात जखमी झालेली महिला येरवडा भागातील आयटी कंपनीच्या कॉल सेंटरमध्ये कार्यरत आहे. तर याप्रकरणातील आरोपीसुद्धा त्याच कंपनीमध्ये कामाला आहे.

आरोपीला पोलिसांनी घेतलं ताब्यात

पुणे शहरातील येरवडा भागातील एका कंपनीच्या पार्किंगमध्ये ही हल्ल्याची घटना घडली आहे. महिलेवर तिच्याच सहकाऱ्याने कोयत्याने वार केले आहेत. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, सदर महिलेवर त्यांच्याच कंपनीतील व्यक्तीने वार केला असून आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. हल्ल्यात जखमी झालेली महिला येरवडा भागातील आयटी कंपनीच्या कॉल सेंटरमध्ये कार्यरत आहे.

हल्ल्यात महिला गंभीर जखमी

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, याप्रकरणातील आरोपीसुद्धा त्याच कंपनीमध्ये कामाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, त्यांच्यात काही वाद सुरू होते. यातूनच त्याने हे कृत्य केल्याची माहिती मिळत आहे. आरोपीने कोयत्याने हल्ला केल्यामुळं महिला गंभीर जखमी असून तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा

# इंस्टाग्राम ग्रुपवरून वाद उफाळल्याने तरुणाचा गळा चिरला

**चाकण | प्रतिनिधी**

मेदनकरवाडी येथील बालाजीनगर भागात जुन्या भांडणाच्या कारणावरून एकाचा गळा चिरण्यात आल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि. ५) रात्री साडेआठ ते नऊच्या दरम्यान घडली. केवळ रुग्णालय जवळ असल्याने गळा चिरलेल्या तरुणाचे प्राण वाचवण्यात यश आले.

सचिन आरेकर (वय २४, ) असे या घटनेत गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. अभिजित सोनवणे असे हल्लेखोराचे नाव असून, त्याच्यावर चाकण पोलिसांत खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हल्लोखोर घटनेनंतर पसार झाला आहे. हल्लेखोर सोनवणे याच्यावर यापूर्वी देखील चाकण पोलिस ठाण्यात काही गुन्ह्यांची नोंद असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून समोर आली आहे. रविवारी रात्री नऊच्या सुमारास ही घटना बालाजीनगर (मेदनकरवाडी, ता. खेड) येथे घडली. हल्लेखोर सोनवणे याने वस्तर्याने आरेकर याचा गळा चिरला. एक कानापासून दुसर्या कानापर्यंत संपूर्ण गळा चिरला गेला.

मात्र, जवळच रुग्णालय असल्याने तत्काळ जखमीला रुग्णालयात हलवण्यात आल्याने त्याचे प्राण वाचले असल्याचे समजते. पोलिसांकडून हल्लेखोर सोनवणे यांचा शोध सुरू आहे. चाकण पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, याबाबत प्राप्त माहितीनुसार इंस्टाग्राम ग्रुपच्या नावावरून हा वाद उफाळून आला. त्यानंतर आरोपीने सचिन आरेकर यास बालाजीनगर येथील पडवळ डेअरीसमोर बोलावून घेतले आणि तिथेच त्याच्यावर वार केल्याचे समजते. यामध्ये आणखी काही आरोपी आहेत का ? याचा पोलीस शोध घेत आहेत.

# तिघांच्या मृत्यूचे तीव्र पडसाद; ग्रामस्थांनी शिक्रापूर-चाकण रस्ता रोखला

शिक्रापूर : पिंपळे जगताप (ता. शिरुर) येथे शिक्रापूर- चाकण रस्त्यावर ६ जानेवारी रोजी शाळेमध्ये मुलाला सोडायला चाललेल्या इसमासह दोन बालकांचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याने पिंपळे जगताप ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. रस्त्याच्या सुधारणेसाठी ग्रामस्थांनी शोकसभा घेत शिक्रापूर- चाकण रस्त्यावर रास्तारोको आंदोलन करत शासनाचे लक्ष वेधले. या घटनेमुळे गावची यात्रा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

पिंपळे जगताप (ता. शिरुर) येथे शिक्रापूर- चाकण रस्त्यावर वारंवार अपघात होत असताना प्रशासनाकडे वारंवार रस्ता सुधारण्याची मागणी होत असताना ६ जानेवारी रोजी मुलाला शाळेमध्ये सोडायला चाललेल्या गणेश खेडकरसह त्यांच्या तम्नय व शिवम या दोन बालकांचा अपघातात मृत्यू झाल्याने ग्रामस्थांनी आक्रमक होत रास्तारोको आंदोलन केले.

यावेळी सरपंच सोनाली नाईकनवरे, अशोक जगताप, ग्राहक पंचायतचे रमेश टाकळकर, पोलीस पाटील वर्षा थिटे, भाजप किसान आघाडीचे प्रदेश सचिव जयेश शिंदे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष भगवान शेळके, चंदन सोंडेकर, भाजपा युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष अशोक शेळके, माजी उपसरपंच सागर शितोळे, महेश जगताप, ज्ञानेश्वर शितोळे,



अक्षय सोंडेकर, स्वप्नील शेळके, रामदास सोंडेकर, शिवाजी जगताप, निलेश फडतरे, सविता थिटे, स्वाती वळसे, मनीषा तांबे, रेश्मा कुसेकर, निर्मला दौंडकर, स्वाती वळसे, मनीषा तांबे निर्मला वळसे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

रस्त्याच्या सुधारण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाशी चर्चा करुन तातडीने रस्त्यावर गतिरोधक, दिशादर्शक फलक बसवून तातडीने उपाययोजना केल्या जाणार असल्याचे आश्वासन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी दिले. ग्रामस्थांनी शांततेत आंदोलन करताना गावची यात्रा रद्द करण्याचा निर्णय घेतला. सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे, रोहिणी सोनावले, पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, पंडित मांजरे यांच्या देखरेखेखाली पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

पंधराशे नको मात्र सुरक्षा द्या

पिंपळे जगताप येथील आंदोलनादरम्यान संतप्त आक्रमक महिलांनी पुढारी फक्त मते मागायला येतात, असे सांगत आम्हाला शासनाचे पंधराशे नको मात्र सुरक्षा हवी, अशी मागणी शासनाकडे केली आहे.

हातभार लावण्याचे आवाहन

पिंपळे जगताप येथील मृत्यांच्या कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्याने त्यांच्या पुढील भवितव्यासाठी शासकीय पातळीवरील मदतीला प्रयत्न करणार असल्याचे सांगत स्वतः भाजप किसान आघाडीचे प्रदेश सचिव जयेश शिंदे यांनी आर्थिक मदत जाहीर करत ग्रामस्थांनी कुटुंबासाठी हातभार लावण्याचे आवाहन केले.

लोकप्रतिनिधींनी फिरविली पाठ

पिंपळे जगतापमध्ये घडलेल्या अपघातामध्ये एका युवकासह त्याच्या दोन बालकांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदय पिळावणारी घटना घडून देखील अद्याप कोणता लोकप्रतिनिधी या कुटुंबाकडे फिरकला नसल्याची खंत चंदन सोंडेकर यांनी व्यक्त केली.

# हनुमान टेकडीवर कोयत्याचा धाक दाखवून तरुणीला लुटले

**पुणे | प्रतिनिधी**

हनुमान टेकडीवर मित्रासोबत फिरण्यासाठी गेलेल्या महाविद्यालयीन तरुणीला कोयत्याचा धाक दाखवून म्हटले आहे. पुण्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. गेल्या काही दिवसापासून हनुमान टेकडीवर लूट मारायची ही तिसरी घटना असून तरुणी कडील एक लाख रुपयाची सोन्याची साखळी चोरून नेली आहे. याबाबत डेक्कन पोलीस ठाण्यात सतरा वर्षीय मुलीने तक्रार दाखल केली आहे. दोन अनोळखी चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरूणी एका महाविद्यालयात शिक्षण घेत असून दुपारी दोनच्या सुमारास तरुणी आणि तिचा मित्र सेनापती बापट रस्त्यावरून हनुमान टेकडी परिसरात फिरायला गेले होते. त्यावेळी चोरट्याने तरुणी आणि तिच्याबरोबर असलेल्या मित्राला धमकावून शिवीगाळ करून केली त्यांना कोयत्याचा धाक दाखविला मारहाण करून छोट्यांनी तिच्या गळ्यातली एक लाख रुपयाची सूज साखळी चोरून नेली घाबरलेली तरुण आणि तिची तिचा मित्र घरी गेले. त्यानंतर दिनांक सहा रोजी डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दिली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीश निंबाळकर यांनी घटनास्थळी भेट दिली पोलीस उपनिरीक्षक सावंत तपास करीत आहेत हनुमान टेकडीच्या परिसरात गेल्या दोन-तीन महिन्यापासून चोरीच्या घटना वारंवार घडत आहेत.

cmyk